मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२४
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष चोविसावे
अंक पहिला

'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार' २०२३

सर्वोत्कृष्ट कादंबरी
₹ ३०,०००/-

प्रदीप कोकरे लिखित
खोल खोल दुष्काळ डोळे

सर्वोत्कृष्ट कथासंग्रह
₹ २०,०००/-

प्रमोदकुमार अणेराव लिखित
झुरळ आणि इतर काही बाही

मराठी मनावर अधिराज्य गाजवणारी कादंबरी

॥ स्वामी ॥

एकसष्ठी...

एका महान पर्वाची

यावेळेस मा. दत्तात्रेय होसबाळे, मा. रघुजीराजे आंग्रे, मा. मृणाल कुलकर्णी, मा. मधुमती शिंदे, मा. पारू नाईक, मा. अखिल मेहता आणि उपस्थित वाचक

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या पुस्तकदालनात 'तवायफनामा' या पुस्तकाचे प्रकाशन. यावेळेस अनुवादिका शुभदा कुलकर्णी, प्रा. डॉ. केशवचैतन्य कुंटे, अखिल मेहता, साहिल मेहता, योजना यादव आणि उपस्थित वाचक

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक पहिला

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
प्रतीक येतावडेकर

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
प्रकाशन	**८**
पुरस्कार	**१०**
वितरकाच्या नजरेतून	**१२**
उपक्रम	**१४**
श्रद्धांजली	**१६**
पुस्तकाच्या पानांतून	
वादळवारा	१८
आता मव्हं काय!	२६
ज्ञानाई सावित्रीबाई फुले	३६
विजय	४०
स्मृतिसुगंध	४६
प्रवाह	५४
दिनविशेष	**६०**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

असा रंगला पुस्तक महोत्सव !

डिसेंबर महिना महोत्सवांचा महिना आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. तानसेन समारोह, हरिवल्लभ संगीत संमेलन तसेच पुण्यात भरणारा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव इत्यादीसारखे प्रथितयश संगीत महोत्सव याच महिन्यात पार पडले. पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी मानली जाते. पुण्यात बाराही महिने काही ना काही सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा प्रकारच्या समारंभांमुळे माणूस समाजात वावरतो. आपल्या आवडीनिवडी, आपले छंद यांची जोपासना करण्याची संधी ही महोत्सवांमुळेच माणसाला सहज मिळत असते.

दिल्लीच्या राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (NBT) वतीने पुण्यात पुस्तक महोत्सवाचे आयोजनही डिसेंबर महिन्यात १६ ते २४ डिसेंबर २०२३ दरम्यान करण्यात आले होते. 'पुणे पुस्तक महोत्सव' या नावाने हा पुस्तकमेळा फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केला गेला होता. स्थानिक यंत्रणेची घेतली गेलेली मदत, राष्ट्रीय पुस्तक न्यास व केंद्र सरकारचे शिक्षण मंत्रालय, यांच्याकडून सढळ हस्ते मिळालेल्या निधीचा योग्य विनियोग झाल्याचा अनुभव पदोपदी येत होता. ग्रंथप्रदर्शनासाठी तब्बल ३०० दालनांची सुसज्ज अशी मंडपव्यवस्था केली होती.

राष्ट्रीय पुस्तक न्यास, साहित्य अकादमी, बालभारती, राज्य मराठी विकास संस्था यांच्या बरोबरीने हिंदी, कन्नड भाषेतील पुस्तक प्रकाशकांचे तसेच पुस्तक विक्रेत्यांचे स्टॉल यांची आकर्षक मांडणी वाचकांना भुरळ घालत होती. साहित्य संमेलनाचा बाजच सर्वत्र जाणवत होता. एखाद्या साहित्य संमेलनात जशी वाचकांची गर्दी असते तशी गर्दी पुस्तक महोत्सवात पाहायला मिळाली. नऊ दिवस चाललेल्या या महोत्सवाने पुस्तकविक्रीचे

उच्चांक तर मोडलेच; मात्र इतरही अनेक विक्रम या निमित्ताने झालेले पाहायला मिळाले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाने पुण्यातील स्थानिक संस्थांचे साहाय्य घेऊन हा महोत्सव यशस्वी केला. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन कॉलेज, पुणे महानगरपालिका या संस्था प्रामुख्याने होत्याच. त्यासोबतच महाराष्ट्र शासनाचेही या महोत्सवाला सहकार्य मिळाले. यावरून एक गोष्ट अधोरेखित होते, ती म्हणजे शासकीय यंत्रणा आणि सोबतीला योग्य अशी जाहिरात असेल तर असे महोत्सव यशस्वी होतात. वाचकांचा, रसिकांचा याला उत्तम असा प्रतिसाद लाभतो.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात याच धर्तीवर मोठा सोहळा म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होय. साहित्य संमेलन आयोजित करणाऱ्या आयोजक संस्था व आयोजन समिती यांच्याकडून केली जाणारी संमेलनाची व्यवस्था यावरही या निमित्ताने चर्चा होणे रास्त आहे. संमेलनाच्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सुविधा या तुटपुंज्या स्वरूपाच्या असल्याचे बरेचदा दिसून येते. ग्रंथप्रदर्शनासाठीच्या ठिकाणी दिली जाणारी मंडपव्यवस्था ही पुरेशी समाधानी नसल्याचा अनुभव बरेचदा येत असतो. त्यासोबत संमेलनात आयोजित केलेले कार्यक्रम हे साहित्याला पूरक किती? व त्यात सहभागी होणाऱ्या लोकांत साहित्यिक लोकांना दिला जाणारा सहभाग किती हाही एक महत्त्वाचा प्रश्न यानिमित्ताने चर्चा करण्यासारखा आहे. अमळनेर येथे होणाऱ्या साहित्य संमेलनात संयोजन समिती कडून काही बदलांची आम्हाला अपेक्षा आहे.

जानेवारीमध्ये नववर्षाच्या सुरुवातीला **'सातारा'** येथे ग्रंथमहोत्सव पार पडला. नेहमीप्रमाणेच याही वर्षी या ग्रंथमहोत्सवाला वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. आमच्या प्रकाशन संस्थेतर्फे दिला जाणारा **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** जानेवारीतील १२ तारखेला वितरित केला जाणार आहे. पदार्पणातील पहिली साहित्यकृती असलेल्या सर्वोत्कृष्ट कादंबरी व सर्वोत्कृष्ट कथासंग्रह अशा दोन वाङ्मय प्रकारांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, इथून पुढे दरवर्षी हा पुरस्कार दिला जाणार आहे.

एकंदरीतच सरत्या वर्षातील शेवटचा महिना व नववर्षाचा पहिला महिना यामध्ये साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आपल्याला पाहायला मिळाली. येत्या वर्षातही अशा अनेक साहित्यिक, सांस्कृतिक नवनव्या प्रकल्पांसह आम्ही वाचकांसाठी नवनवे उपक्रम घेऊन येत राहू. आमच्या सर्व वाचकांना, हितचिंतकांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

अखिल मेहता

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

Available on

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

available on :
ebook

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

प्रकाशन

'तवायफनामा' या पुस्तकाचा अनुवाद मराठीतील एक महत्त्वाचा दस्तऐवज : प्रा. केशवचैतन्य कुंटे

सबा दिवाण लिखित 'तवायफनामा' या पुस्तकाचे प्रकाशन मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तक दालनात झाले. या वेळेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातील प्रा. केशवचैतन्य कुंटे, अनुवादिका शुभदा कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता व साहिल मेहता, संपादिका योजना यादव हे उपस्थित होते. तसेच वाचकांची उपस्थितीही लक्षणीय होती. प्रकाशन समारंभानिमित्ताने वाचकांना 'तवायफनामा' हे पुस्तक सवलतीच्या दरात उपलब्ध केले होते. त्यावर अनुवादिका शुभदा कुलकर्णी यांची स्वाक्षरी घेण्याची संधी वाचकांना या वेळेस मिळाली.

मध्ययुगीन काळापासून ख्याल संगीताला समांतर असलेली तवायफ असणाऱ्या कलावंतांची गझल, ठुमरी या गायकीचे अनेक कंगोरे असणारी कला उत्तर भारतात ऐन प्रसिद्धीस होती; मात्र मध्यमवर्गीय संकुचित मानसिकतेमुळे तवायफ कलावंतांची ही कला एकोणिसाव्या शतकात काळाच्या उदरात गडप झाली, ही खंत केशवचैतन्य कुंटे यांनी मनोगतात व्यक्त केली.

अनुवादक हा अनुवाद करताना ते पुस्तक एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असताना त्या मूळ पुस्तकाचा गाभा आहे तसाच ठेवून त्याचा अनुवाद करत असतो. अनुवादक हा एक प्रकारे स्वतंत्र लेखकच असतो, असे प्रतिपादन प्रकाशक अखिल मेहता यांनी केले. अनुवादिका शुभदा कुलकर्णी यांनी अनुवाद करत असतानाचे अनुभव आपल्या मनोगतात कथन केले. अखिल मेहता यांनी आभार मानले.

◆

नवी संहिता... नवा आशय...

मी ग़ालिब बोलतोय...!

शब्बीर रोमानी



मानवी भावभावनांना शब्दांचं कोंदण देणाऱ्या युगकवीचा जीवनप्रवास, त्यानं सांगितला असता अगदी तसाच...

किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुरस्कार

प्रकाशक सुनील मेहता पुरस्कार

आमच्या प्रकाशन संस्थेतर्फे दिला जाणारा 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार' १२ जानेवारी, २०२४ रोजी वितरित केला जाणार आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ एस. एम. जोशी सभागृहात संध्याकाळी ५ वाजता होणार आहे. प्रदीप कोकरे यांची **'खोल खोल दुष्काळ डोळे'** ही कादंबरी आणि प्रमोदकुमार अणेराव यांचा **'झुरळ आणि इतर काहीबाही'** हा कथासंग्रह यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. या पुरस्कारासाठी आलेल्या साहित्य-कृतींचे परीक्षण शिवाजी विद्यापीठातील प्रा. रणधीर शिंदे यांनी केले. पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, इथून पुढे दरवर्षी हा पुरस्कार दिला जाणार आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे पुरस्कारार्थींचं हार्दिक अभिनंदन!

साहित्य अकादमी पुरस्कार

साहित्य अकादमी तर्फे देशातील २४ भाषांमध्ये उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकांना साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवले जाते. २०२३ सालातील मराठी भाषेसाठीचा साहित्य अकादमी

पुरस्कार कृष्णात खोत यांच्या 'रिंगाण' या कादंबरीस जाहीर झाला आहे. चांदोली धरणाच्या निर्मितीवेळी झोळंबी आणि परिसरातील विस्थापितांची जी परवड झाली, त्याचं वास्तव चित्रण करणारी ही कादंबरी आहे. कृष्णात खोत यांच्यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील सात साहित्यिकांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार मिळवणारे कृष्णात खोत हे कोल्हापूर जिल्ह्यातील आठवे साहित्यिक. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांचं हार्दिक अभिनंदन!

अंकुर साहित्य संघाचा वाङ्मयीन पुरस्कार आणि दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, लोकमंगल साहित्य पुरस्कार वसंत गायकवाड यांना प्रदान

अंकुर साहित्य संघाच्या वाङ्मयीन पुरस्कारांचं वितरण २३ डिसेंबर, २०२३ रोजी करण्यात आलं. अकोला येथील गुरुकृपा मंगल कार्यालयात ६१व्या अखिल भारतीय अंकुर मराठी साहित्य संमेलनात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांतर्गत कादंबरीसाठी देण्यात येणारा पुरस्कार वसंत गायकवाड यांना यांच्या 'तथागत गोतम बुद्ध' या कादंबरीसाठी प्रदान करण्यात आला. तसेच याच कादंबरीसाठी वसंत गायकवाड यांना दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कारानेही गौरवण्यात आलं. हा पुरस्कार त्यांना २४ डिसेंबर, २०२३रोजी प्रदान करण्यात आला.

नवव्या लोकमंगल साहित्य पुरस्कारासाठी 'तथागत गोतम बुद्ध' या कादंबरीची निवड झाली. हा पुरस्कार राजीव खांडेकर यांच्या हस्ते सोलापूर येथे ७ जानेवारी, २०२४ रोजी प्रदान करण्यात आला.

◆

वितरकाच्या नजरेतून

Evolving Reading Habits : A Glimpse into 2023

As a seasoned bookseller with 23 years of experience in the charming town of Kolhapur, I've witnessed a fascinating transformation in the reading habits of our community over the past decade. In the ever-changing landscape of literature consumption, some intriguing trends have emerged, shaping the choices of avid readers.

Diverse Genres Thriving

In the heart of Kolhapur, readers continue to embrace a diverse range of genres. While fiction and non-fiction maintain their timeless allure, there's a noticeable surge in interest towards regional literature. Readers are keen to explore narratives that delve into local cultures and address pertinent social issues.

Post-Lockdown Reading Renaissance

The aftermath of lockdowns has seen a delightful resurgence in the love for physical books. Many attribute this to the lower dopamine activity associated with reading compared to screen time, leading

individuals to seek solace in the immersive world of literature. The joy of turning pages and the tactile experience of a book seem to offer a welcome escape from the digital hustle.

Children's Literature : A Flourishing Frontier

One remarkable shift is the tremendous growth in the variety of children's books available and, subsequently, the increased enthusiasm among young readers. Parents and educators alike are encouraging the habit of reading, recognizing its role in cognitive development. The expansive array of children's books, spanning diverse themes and genres, has undoubtedly contributed to this surge in interest.

Self-Help in Regional Languages : A Booming Market

In the cultural tapestry of Kolhapur, self-help books in regional languages, particularly Marathi, have witnessed a remarkable upswing in sales. Readers are drawn to motivational and self-improvement literature that resonates with their cultural and linguistic roots. This trend underscores a growing awareness and appreciation for personal development within our community.

As we navigate this dynamic era of literature, it's heartening to see the enduring passion for books in Kolhapur. The written word continues to be a source of inspiration, education and entertainment, weaving its magic through the lives of avid readers in our quaint town. Here's to many more years of fostering a love for books and celebrating the rich tapestry of stories that unite us all. Happy reading!

Warm regards,
Vishal Pinjani
GRANTH THE BOOK WORLD
◆

उपक्रम

‘स्वामी’ कादंबरीचा षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा

आणीबाणीच्या काळात तुरुंगात वाचली ‘स्वामी’ कादंबरी : दत्तात्रय होसबाळे

पुणे : ‘वैचारिक ग्रंथ आणि संदर्भ ग्रंथांच्या जेव्हा अनेक आवृत्त्या निघतात, ती पुस्तके त्या व्यक्तिमत्त्वाचे विचार जिवंत ठेवतात आणि समाजाला मार्गदर्शन करतात. समाज आणि संस्कृतीला बळ देतात. त्यामुळेच आणीबाणीच्या काळात तुरुंगात असताना ‘स्वामी’ कादंबरी वाचून दाखवली गेली होती.’ त्या काळात या कादंबरीने प्रेरणा दिली असल्याची आठवण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी सांगितली. ते ‘स्वामी’ कादंबरीच्या षष्ट्यब्दीपूर्ती सोहळ्यात बोलत होते.

पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, प्रकाशक अखिल मेहता, रणजित देसाईंच्या कन्या पारू नाईक आणि मधुमती शिंदे उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना होसबाळे म्हणाले, ‘ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्या लोकांपुढे आव्हान असतं. इतिहास जाणणारे त्यातील त्रुटी काढतात; पण रणजित देसाईंनी अद्‌भुत काम केलं आहे. एक महापुरुष सामान्य माणूस म्हणून कसा असतो, त्याचा आविष्कार देसाईंनी आपल्या पुस्तकातून दाखवला. एका राज्यकर्त्याची सर्वांत मोठी उपलब्धी काय असेल. सत्तासंघर्षात विजय ही उपलब्धी असतेच;

पण व्यक्तिगत आयुष्यात त्यांनी कोणती जीवनमूल्यं अंगीकारली ही त्यांची खरी उपलब्धी असते. महापुरुष जेव्हा या दोन्हींचा संगम साधतात, तेव्हा ते महापुरुष बनतात. 'स्वामी' कादंबरीत हे अत्यंत प्रभावशाली पद्धतीने मांडलं गेलं आहे. सोळाव्या वर्षी माधवरावांना पेशवेपदाची धुरा सांभाळावी लागली. एकीकडे निजामाचं आक्रमण आणि दुसरीकडे कलहाचं वातावरण असताना त्यांनी मराठी साम्राज्य पुनर्जीवित केलं. त्यामुळे 'स्वामी' कादंबरी ही तत्कालीन राजनीतिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकते.

'एखाद्या कादंबरीची एकसष्टी साजरी करणं हे खरंच गौरवास्पद आहे. मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर, माधवराव पेशव्यांवर लिहू इच्छित होते; पण रणजित देसाई या विषयावर लिहू इच्छितात हे कळल्यावर त्यांनी आपला विचार बदलला आणि रणजित देसाईंना शुभेच्छा दिल्या.' रणजित देसाईंनी तो विश्वास सार्थ ठरवला असल्याचंही होसबाळे म्हणाले.

यावेळी बोलताना अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी 'स्वामी' मालिकेच्या अनुभवांना उजाळा दिला. 'स्वामी' कादंबरीने मला ओळख दिली. या विषयासाठी, दादांच्या लेखणीसाठी मी अनेकदा ही कादंबरी वाचते. त्यामुळे मी दिग्दर्शक झाल्यावर मला 'स्वामी' कादंबरी चित्रपटाच्या रूपात आणावीशी वाटली,' असं यावेळी मृणाल कुलकर्णी यांनी सांगितलं. 'रमा ही एक विलक्षण संघर्ष अनुभवलेली ऐतिहासिक व्यक्तिरेखा आहे, त्यामुळे आत्ता दादा असते तर मी त्यांना रमेच्या जीवनावर लिहिण्याचा आग्रह केला असता,' असंही त्या म्हणाल्या.

''स्वामी' ही एका पेशव्याची कादंबरी नाही, तर तो त्या काळाचा प्रवास आहे. एकीकडे निजाम तर दुसरीकडे अंतर्गत कलह अशा स्थितीत माधवरावांनी नेतृत्व केलं, जे रणजित देसाईंनी शब्दांत मांडलं. भाषेवर प्रभुत्व असेल तरच लेखकाकडून असं सकस लेखन होतं. रणजित देसाई असे सिद्धहस्त लेखक होते. त्यांनी माधवरावांची स्वामीची दोन रूपं मांडली. एक, स्वामी म्हणजे राजा आणि दुसरा स्वामी म्हणजे आध्यात्मिक स्वामी.' माधवरावांच्या आयुष्यातील अशा विलक्षण प्रसंगांनी 'स्वामी' कादंबरी सजली असल्याचं रघुजीराजे आंग्रे यांनी सांगितलं.

रणजित देसाई यांच्या दोन्ही कन्या आणि त्यांच्या नातवांनीही यावेळी आपल्या आठवणींना उजाळा दिला.

◆

श्रद्धांजली

रवींद्र बागडे

ज्येष्ठ लेखक रवींद्र बागडे यांचं निधन झालं. त्यांच्या 'गटुळं' आणि 'बोचकं' या दोन आत्मकथनात्मक कादंबऱ्या मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केल्या. या कादंबऱ्या भारतीय समाजव्यवस्थेतल्या दीनदलित समाजाचे प्रश्न थेट मांडतात. दलित साहित्यामध्ये या कादंबऱ्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. लहानपणापासून लेखनाची व समाजकार्याची आवड असलेल्या बागडे यांनी मुंबईत झोपडपट्टीवासीयांकरिता, विशेषत: धारावी, अंधेरी, बोरिवली येथे नागरी सुधारणेचे व समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांची इतरही पुस्तके प्रकाशित असून, वृत्तपत्रांमधूनही त्यांनी लेखन केले. रवींद्र बागडे यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

नवी संहिता... नवा आशय...

शेअरबाजार

अतुल कहाते

विदेशी शेअर दलालांच्या रोचक कहाण्यांतून
शेअर बाजाराचा घेतलेला सर्वांगीण वेध

किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

द एलेफंट व्हिस्परर

लॉरेन्स अँथनी

आणि

ग्रॅहम स्पेन्स

अनुवाद

मंदार गोडबोले



जंगली हत्तींच्या कळपाला माणसाळणाऱ्या
एका रानवेड्याची अचंबित करणारी आत्मकथा...

किंमत : ५७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



बादळवारा

मनोहर माळगांवकर

अनुवाद

भा. द. खेर

जुलमी इंग्रजी सत्तेलाही भयग्रस्त करत, १८५७च्या उठावात स्वातंत्र्याच्या स्वप्नांची पेरणी करणाऱ्या नानासाहेब पेशव्यांच्या जीवनाची रंजक कहाणी

बिठूरला पिताजींच्या कागदपत्रांत एक छापील बाड सापडलं. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग यांना सादर केलेलं हे अपील होतं. त्या कैफियतीच्या पहिल्या कोऱ्या पानावर लिहिलं होतं–

'पदच्युत आणि हद्दपार झालेल्या महाराजाकडून त्याच्या पदच्युत आणि हद्दपार झालेल्या पेशव्यास'-

या राजेरजवाड्यांबद्दल माझे पिताजी नेहमीच तिरस्कारानं बोलायचे. म्हणायचे, 'हे कसले राजे! पेंढा भरलेल्या वासरांसारखी यांची अवस्था झालीय.' माझे पिताजी पुढं म्हणायचे, 'आमचे राजे हे असे आहेत निर्जीव वासरांसारखे! प्रजारूपी गाय मात्र निर्जीव वासरांकडे प्रेमानं बघून दूध देत असते.' पिताजींचं म्हणणं तंतोतंत खरं होतं. प्रतापसिंहमहाराज आणि त्यांच्या पूर्वीचे राजे हे केवळ नामधारी राजे बनले होते. तब्बल शंभर वर्षं झाली होती, त्यांच्या घराण्यातलं राजेपण संपलं होतं. पेशव्यांचे ते जणू कैदी बनले होते. म्हणजे छत्रपती कैदेत आणि तेही कुणाच्या, तर त्यांच्याच पंतप्रधानाच्या! छत्रपतींच्या घराण्यातले हे नामधारी अवशेष म्हणून नांदत होते. प्रजेची स्वामिनिष्ठा टिकवून धरण्यासाठी त्यांचा उपयोग होईल. एरवी छत्रपती हे सातारच्या किल्ल्यात जवळजवळ कैदेतच होते. त्यांच्या खर्चावर बंधनं होती. ठरीव चाकोरीतून त्यांना चालावं लागे. छत्रपती प्रतापसिंहमहाराज आणि त्यांच्या आधीचे महाराज यांची अवस्थाच मुळी बेडकांसारखी झालेली होती - खोल विहिरीत सोडलेल्या बेडकांसारखी! साहजिकच त्यांना पेशव्यांबद्दल जळफळाट वाटे. त्यांना ते शिव्याशाप देत. क्वचित् प्रसंगी पेशव्यांचा पाडाव व्हावा म्हणून ते कटही करीत असत.

हिंदुस्थानात ब्रिटिशांचं राज्य येण्यापूर्वी बऱ्याच मोठ्या मुलखावर मराठ्यांची सत्ता होती. पण पेशवे हेच खरे सर्वसत्ताधीश होते. बाजीराव हे आमच्या घराण्याचं थोर नाव माझ्या पिताजींनी धारण केलं. १७९६ साली त्यांच्याकडे पेशवेपद आलं. पण या दिवट्या पेशव्यानं अल्पावधीतच दिवे लावले. घराण्याचा एवढा अपरंपार वारसा आणि एवढी धुरंधर कीर्ती एवढ्या अल्पावधीत रसातळाला न्यायलाही कर्तबगारी लागतेच! ती कर्तबगारी त्यांनी करून दाखवली. माझे पिताजी होतेच तसे! नीच, निर्दय, खुनशी आणि द्रव्यलोभी! पण त्याचबरोबर त्यांची विद्वत्ता वाखाणण्यासारखी होती. पैशाअडक्याच्या व्यवहारात ते दुरुस्त होते. ते धार्मिक वृत्तीचे होते, पण त्या वृत्तीलाही सरळपणापेक्षा दुष्टपणाची झालर जोडलेली असे. दुबळेपणा तर त्यांच्या पाचवीला पूजलेला होता. त्यामुळं प्रजेला त्यांचा तिरस्कार वाटायचा. त्यांच्या भित्र्या स्वभावावर कुणी तरी एक गाणं रचलं होतं-

विहिरी केल्या कोरड्या
जमिनी बनल्या उजाड

तिथे जमविले काटेकुटे
पळपुट्या बाजीरावाने

अशा या बाजीरावांनी मला दत्तक घेतलं होतं. ते माझे जन्मदाते वडील नव्हते असं म्हणून भागणार थोडंच होतं? कारण ते जरी माझे जन्मदाते वडील नव्हते तरी जन्मदात्या पित्यासारखाच त्यांचा माझ्यावर प्रभाव पडला होता. त्यामुळे ते माझे दत्तक वडील होते असं म्हणून मनाचं समाधान करून घेण्यात काहीच अर्थ नव्हता. त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांमुळं माझं जीवन बरबाद झालं. पण त्याहीपेक्षा वडिलांची ती दुष्कीर्ती पुसून टाकायला मी असमर्थ ठरलो ही जाणीव मला एखाद्या अदृश्य जन्मखुणेसारखी जन्मभर मनात वागवावी लागली.

१८१८ साली दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना इंग्रजांनी पदच्युत केलं आणि बिठूरला त्यांची रवानगी केली. बिठूरला त्यांच्याबरोबर कित्येक आश्रित आलेले होते. त्या लवाजम्यात माझे जन्मदाते आई-वडीलही होते. माझ्या जन्मदात्या पित्याचं नाव होतं माधव भट आणि माझं नाव ठेवलं होतं धोंडू. माझ्या जन्माच्या आधी माझ्या आईला तीन मुलं झाली होती. पण त्यातलं एकही मूल जगलं नव्हतं. बालपणीच त्यांना काळानं ओढून नेलं. आपल्याला हा शाप असला पाहिजे असं आई-वडिलांना वाटायला लागलं. मग हा शाप दूर करण्यासाठी त्यांनी हरद्वारची यात्रा केली. तिथल्या अंबाबाईची यथासांग पूजा बांधून नवससायास केले. मुलगा झाला तर त्याचं नाव दगडू धोंडू असं काही तरी ठेवू असा नवस ते बोलले. यात्रेचं फळ लगेच त्यांच्या पदरातही पडलं. त्यानंतर त्यांचं मूल जगलं. माझ्या जन्मानंतर त्यांना दोन मुलगे झाले. एक बाबा आणि दुसरा बाळाराव.

अंबाबाईला केलेला नवस फेडण्यासाठी माझं नाव धोंडू ठेवलं. परंतु मला नेहमीच धोंडोपंत म्हणत असत. माझ्या आई-वडिलांना एका गोष्टीचा आनंद वाटायचा. मी राजा होणार असं भविष्य माझ्या पत्रिकेवरून कुणीतरी वर्तवलं होतं.

ज्योतिषानं सांगितलं होतं -

हा मुलगा राजा होणार आणि
त्याच्या कीर्तीचा सुगंध दूरवर पसरणार!

या माझ्या भविष्यामुळंच बाजीरावांनी गादीचा वारस म्हणून मला दत्तक

घेतलं असावं. त्यांनी जे गमावलं ते कदाचित मी कमवू शकेन असंदेखील त्यांना वाटलं असावं.

आणि दैवदुर्विलास असा की, माझ्याविषयी केलेलं भाकीत खरं ठरलं. मी खरोखरच राजा झालो आणि इतरांच्यापेक्षा माझी कीर्ती दूरवर पसरली.

१८२७ साली बाजीरावांनी मला दत्तक घेतलं. त्यावेळी त्यांचं वय होतं बावन्न वर्षांचं आणि मी होतो फक्त तीन वर्षाचा! दत्तक घेतल्यावर माझं नाव नानासाहेब असं ठेवण्यात आलं. पेशव्यांच्या घराण्यातील नानासाहेब हे नाव मला मिळालं. धोंडोपंत आणि नानासाहेब अशा दोन्ही नावांनी मी ओळखला जाऊ लागलो.

अशा तऱ्हेनं मी पेशव्यांचा वारसदार बनलो. मी जर दत्तक गेलो नसतो तर मला एवढं मोठं ओझं खचित वाहावं लागलं नसतं. कारण माझे आई-वडील पापभीरू होते, देवभोळे होते. कुणाचं काही वाईट करावं हे त्यांच्या स्वभावातच नव्हतं. उलट बाजीरावांची ऐहिक मालमत्ता खूप होती. परंतु त्यांच्या पापकृत्यांचा बोजाही प्रचंड होता. हा सारा वारसा माझ्याकडे आला.

माझ्या दत्तकविधानाच्या समारंभासाठी शंभर ब्राह्मणांची हजेरी लागली होती, असं सांगतात, खरंही असेल ते! कारण बाजीरावांचं सारं आयुष्य फक्त दोनच गोष्टींनी व्यापलं होतं धर्मभावना आणि कामवासना! मागचापुढचा कसलाही विचार न करता ते ब्राह्मणांना दानधर्म करायचे एक गोष्ट तर मी प्रत्यक्षच बघितली होती. एकदा ते गंगातीरावर देवदेव करीत बसले होते. त्याच वेळी त्यांचं तिमाही पेन्शन कानपूरहून आल्याचं त्यांना समजलं. पेन्शनची ती सारी रक्कम आपल्याबरोबरच्या ब्राह्मणांना दान म्हणून देऊन टाकण्याचा हुकूम त्यांनी फर्माविला.

म्हणाले, ''गंगामाईजवळ एकदा जे आणले ते परत नेता येत नाही.'' आणि पेन्शनची आलेली पंचवीस हजार पौंड रक्कम त्यांनी दान देऊन टाकली!

तेव्हा माझ्या दत्तविधानाच्या वेळी शंभर ब्राह्मण हजर असतील यात नवल नाही. मंत्रजागर करून त्यांनी सारे विधी यथासांग पार पाडले असतील. त्या समारंभाच्या पवित्र स्थळापासून काही अंतरावर, पण मानाच्या जागेवर, ब्रिटिश रेसिडेंटही हजर असेल. कारण बिठूरला त्या वेळी दरबार भरायचा आणि त्या दरबारात रेसिडेंट असायचा.

मराठा राजांपैकी मात्र कुणी या समारंभाला हजर असेल असे वाटत नाही. कारण त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवायला बाजीरावांनी मुभा ठेवलेली

नव्हती. अर्थात त्यांना मुभा असती तरी त्यांच्यापैकी या समारंभाला फारसं कुणी आलं नसतं. कारण ब्रिटिशांपेक्षाही बाजीरावांबद्दल त्यांच्या मनात अधिक द्वेषभाव होता. पेशवेपदावर असताना बाजीरावांनी आपल्या सत्तेचा मनमुराद वापर केला होता. किरकोळ खुसपट काढून सरदारांची मालमत्ता हिरावून घेतली होती. एवढ्यावरच भागलं नव्हतं; तर त्यांच्या बायका-मुलींना भ्रष्ट केलं होतं. एखाद्या तोलाच्या कुटुंबप्रमुखाला पकडून आणावं आणि त्याच्या मुक्ततेसाठी त्याच्या पत्नीला, बहिणीला किंवा मुलीला आपल्या वाड्यावर बोलवून घ्यावं. आपल्या खानपानात त्यांना सामील करून जल्लोष करावा. आज्ञाभंग करणाऱ्यांची धडगत नसे.

बाजीरावांना एक विलक्षण छंद होता. सुंदर बायका कपडे बदलताना कशा दिसतात हे पाहायला त्यांना फार आवडायचं. एका खास छोट्या ऐनेमहालात सारी दरोबस्त व्यवस्था असे. तिथे गर्भरेशमी साड्या, अत्तराचे बुधले आणि भारीपैकी सौंदर्यप्रसाधनं असत.

त्या ऐनेमहालात पाहुण्या स्त्रियांना सेवक आदबीनं आणून सोडत. तिथे असलेल्या उंची गर्भरेशमी भरजरी लुगड्यांपैकी आवडेल ते लुगडं घेऊन ते त्यांनी तिथंच नेसावं अशी श्रीमंतांची आज्ञा असे. या बायका लुगडं नेसत असताना आरशाजवळच्या फटीतून बाजीराव त्यांच्याकडे तास न् तास चोरून बघत बसत. याहीपेक्षा काही विचित्र गोष्टी लपूनछपून चालायच्या. कधीकधी ते आपल्या जिवलग मित्रांना खानदानी कुटुंबातील स्त्रियांशी एकान्त करायला भाग पाडत. जणू कुंटणखान्यातून त्या स्त्रियांना आणलेलं असे. कधीकधी बऱ्याच स्त्री-पुरुषांना एखाद्या अंधाऱ्या खोलीत एकत्र आणून सोडून दिलं जाई.

एकदा तर त्यांनी आपल्या एका सरदारावरच सूड उगविल्याचं ऐकिवात होतं. या सरदारानं बाजीरावांच्या एका आवडत्या गायिकेलाच पळवून नेलं होतं. त्या सरदाराला बाजीरावांनी एका अंधाऱ्या खोलीत नेऊन ठेवलं. तिथं आधीच एका स्त्रीला पाठवलं होतं. त्या दोघांचा एकान्त चालू असतानाच खोलीत दिवा आणायची आज्ञा बाजीरावांनी दिली. खोलीत उजेड पडताच सरदार शरमिंधा झाला. त्यानं जिच्याशी एकान्त केला होता ती त्याचीच आई होती.

ज्या परंपरागत सरदारांच्या बळावर त्यांचं राज्य टिकाव धरून होतं तेच सरदार बाजीरावांच्या या विकृत वर्तनामुळे त्यांच्या विरूद्ध उठले. परंतु अशाही परिस्थितीत तब्बल बावीस वर्ष त्यांचं पेशवेपद टिकलं. लाघवी भाषा, मोहक

मुद्रा आणि एकाला दुसऱ्या विरुद्ध उठविण्याचं कसब हे तर त्यांचं भांडवलं होतं. नेत्याच्या अंगी जे गुण असावे लागतात त्यांचा मागमूसही त्यांच्याजवळ नव्हता. अंगी पराक्रम नव्हता. अनेक युद्धं त्यांनी पाहिली, पण लांबून लांबून! तोफांचा आवाज कानी पडला तर पाय लावून ते धूम पळून जात. म्हणूनच सारेजण त्यांना 'पळपुटे बाजीराव' म्हणत.

१८०२ साली ऐन थंडीच्या दिवसातील लढाईत नेमका हाच प्रकार घडला. म्होरक्या सरदारांपैकी होळकरांचं बंड मोडायला बाजीराव धावून गेले आणि रणांगणाला त्यांनी पाठ दाखवली. ते ब्रिटिशांच्या सापळ्यात सापडले. सापळ्याचं दार बंद झालं. बाजीराव त्यात कायमचे बंदिस्त झाले.

ब्रिटिशांनी भरघोस मदतीचा हात पुढं केला. मराठ्यांचा सर्वसत्ताधीश त्यांच्यापुढं मदतीची याचना करीत होता. त्यांनी बाजीरावांना मनमुराद साहास्य केलं. त्यांच्यावर देणग्यांचा वर्षाव केला. नंतर त्यांना भरभक्कम लव्याजम्यानिशी पुण्याला पाठवून पेशव्यांच्या गादीवर नेऊन बसवलं. तेव्हापासून पुण्यात ब्रिटिशांची तैनाती फौज ठेवण्यात आली - पेशव्यांचं त्यांच्याच सरदारांपासून संरक्षण करण्यासाठी! या तैनाती फौजेत सहा हजार सशस्त्र पायदळ होतं. या सैन्यतुकडीच्या खर्चासाठी बाजीरावांनी ईस्ट इंडिया कंपनीला आपला मोठा मुलूख तोडून दिला. पश्चिम किनारपट्टीवरील ज्या भूभागाचा ताबा हस्तगत करण्यासाठी ब्रिटिशांची जवळजवळ शंभर वर्षं धडपड चालू होती, तोच मुलूख बाजीरावांनी त्यांना खुशाल देऊन टाकला.

काही का असेना, बाजीराव पुण्याला परत आले. ईस्ट इंडिया या व्यापारी कंपनीच्या नव्या मित्रांनी त्यांची गादी पक्की केली. त्यानंतर पेशवा म्हणून त्यांनी सोळा वर्ष राज्यकारभार चालवला.

ब्रिटिशांनी बाजीरावांची सत्ता इतकी वर्षं राहू तरी कशी दिली असा प्रश्न अनेकांना पडतो. परंतु ज्यांना ब्रिटिशांचा स्वभावधर्म माहीत आहे, त्यांना या प्रश्नाचे उत्तर सहज सापडण्यासारखं आहे. गळू पुरतं पिकल्याशिवाय ते कापायचं नाही अशी ब्रिटिशांची पद्धतच असते. फळ पक्व होऊन आपोआप गळेपर्यंत ते थांबतात. पेशव्यांच्या बाबतीतदेखील त्यांनी असंच केलं. त्यांनी पद्धतशीरपणानं पेशव्यांना त्यांच्या सरदारांपासून वेगळं पाडलं. नंतर सरदारांवर आपलं लक्ष केंद्रित केलं. एक एक करीत त्या साऱ्यांना पुरतं नामशेष करून टाकलं.

ब्रिटिशांच्या दयेवर हे दिवस जगत असताना बाजीरावांची अवस्था पेंढा भरलेल्या वासरासारखी झाली होती. याच काळात त्यांनी अनेक शत्रूही निर्माण केले. त्यांची द्रव्यलोभी वृत्ती पराकोटीला पोचली होती. आपल्याच मालकीच्या उत्पन्नाचा त्यांनी लिलाव मांडला आणि लिलाव घेणाऱ्यांनी जनतेला पुरतं पिळून काढलं. स्वत: बाजीरावांचा सारा काळ ख्यालीखुशालीत जात असे. त्यांची भेट घ्यायची झाली तर त्यांच्या बदमाश बगलबच्चांची खुशी संपादन करावी लागे. हे बगलबच्चे होते तरी कोण? गावंढळ, अडाणी, तृतीयपंथी, उक, साहसी सोदे, खुषमस्करे, तोंडपुंजे भट आणि भिक्षुक असे नाना तऱ्हेचे लोक होते.

◆

नवी संहिता... नवा आशय...

झिरो डे

एस. हुसैन झैदी

अनुवाद

वर्षा वेलणकर



सायबर गुन्ह्यांच्या साखळीची पोलखोल करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या धाडसाची गुंतवून ठेवणारी कहाणी...

किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

TBC-33 Book No. 5

हेड्स यू विन

जेफ्री आर्चर

अनुवाद

पूर्णिमा कुंडेटकर



मास्टर स्टोरीटेलर जेफ्री आर्चर यांची नवी अफलातून कादंबरी

किंमत : ८५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

लोकशाहीच्या हत्येसाठी

भारताचा जुलुमशाहीकडे प्रवास

देबाशीष रॉय चौधरी

जॉन कीन

अनुवाद

उत्पल व. बा.



अस्तित्वाच्या दैनंदिन लढायांवर प्रकाशझोत टाकत भारतीय लोकशाहीच्या यशापयशाचा सांगोपांग आलेख मांडणारं प्रभावशाली पुस्तक

किंमत : ४६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



आता मह्ं काय!

डॉ. देविदास तारू

दारिद्र्य, गुन्हेगारी आणि वंचनांच्या कात्रीत सापडलेला असतानाही शिक्षणाची वाट अंगीकारून जगण्याचा आदर्श उभा करणाऱ्या लेखकाचं हृदयस्पर्शी आत्मकथन

''दैदास्यावं ऽऽ''

असा आवाज काढून माय मला हाका मारायची ''याचं मडं जावू दे, कुठं खपलंय की हे पोरगं,'' असे म्हणून येणाऱ्या जाणाऱ्या माझ्या दोस्तांना ती विचारायची. ''दैदास्या दिसलां का रं तिकडं कुठं?''''न्हाय ब्बां आम्हाला न्हायी दिसला त्यो'' असं ती मुलं तिला म्हणायची अन् निघून जायची. मोहल्ल्यामध्ये सगळीकडे ओरडून-ओरडून मंदिरापाशी

मुख्य रस्त्यावर येऊन पुन्हा एकदा 'दैदास्या'चा नारा लावत. आम्ही पोरं रात्रीला लपना-छपनी, आटाचम्मा किंवा लायटाखाली बसून खेळणारे खेळ खेळायचो. अशा खेळायच्या टायमालाच, माय ''भाकर खांय ऽ भाकर खांय ऽ'' म्हणून म्हागं लागायची. मी अंधारात लपून गुपचूप तिचा आवाज ऐकायचा; पण बोलायचाच नाही. ती ओरडून-ओरडून तिथूंन निघून गेली की, पुन्हा पोरांसोबत येऊन खेळायचा. म्हणून मी जर रात्री लवकर घरी आलो नाही तर माय अशी माझ्या नावानं ओरडायची. अहो! मी किती तरी वर्षानं, नवसानं, ८-९ वर्षानं झालेला. म्हणजे माझ्या सावत्रमायला करून आणल्यानंतर आणि माझ्या सावत्र भावाचा जन्म झाल्यानंतर दोन वर्षांनी मी जन्मलो होतो. येवढी रेअर केस असूनसुद्धा माय मला 'याचं मडं जाऊ दे' म्हणून घान घान शिव्या द्यायची.

माझ्या जन्माच्या अगोदर माझ्या जन्माचे अनेक किस्से मला मायकडून व मोहल्ल्यातील अनेक लोकांकडून समजले. आमचा मोहल्ला म्हणजे जिल्ह्याच्या ठिकाणापासून पोलीस ठाणे, एस पी ऑफिस, बसस्टेशन, रेल्वेस्टेशन, सरकारी दवाखाना, मुख्य पोस्ट ऑफिस, जिल्हा न्यायालय, नगरपालिका, (सध्याची महानगरपालिका) आणि जिल्हा परिषद अशी सर्व प्रमुख ऑफिसेस पाच ते दहा मिनिटाच्या अंतरावर असलेला भीमघाट होय. भीमघाट एकदम नदीच्या तीरावरच वसलेले. त्यामुळे पाण्याची मुबलक व्यवस्था असलेले. पुराचे पाणी कधी कधी घरावरून जायचे. अहो घर तरी काय? हंगामी चार बांबू, दोन चार मोठे बाभळीचे लाकडे, पाचट, तुराट्या आणि पाचट बांधण्यासाठी सुतळी किंवा काथ्या हे म्हणजे घर. शहराच्या एवढेजवळ पण प्रगतीपासून कोसो दूर होते.

अशा या मोहल्ल्यामध्ये बापू, नांदेड टेक्सटाइल्स मिलमध्ये मजूर म्हणून कामाला आला होता. इथे घर नसलेल्या लोकांना मिलने तात्पुरती राहायला जागा दिली होती. आज ७० वर्षाच्या वर झाले असतील आम्ही येथेच राहतो पण आजही ही जागा आमच्या नावाने नाही. माझा बापू त्या वेळी पंचवीस एक वर्षाचा असेल. त्या वेळी बापू कामानिमित्ताने नागापूर या नांदेडच्या जवळ असलेल्या खेड्यातून येथे आला होता. ही जागा मिल प्रशासनाने गुरुद्वारा बोर्डाकडून लीजवर घेतली होती. म्हणजे भीमघाटच म्हणून नाही तर देगावचाळ, गंगाचाळ, पथरचाळ, भय्यासाहेब आंबेडकरनगर, नल्लागुटाचाळ, इत्यादी

छोटे छोटे वॉर्ड या जागेवर आजही तग धरून आहेत.

अ. माझी माय

तर मी वर सांगितल्याप्रमाणे माझ्या जन्माच्या अनेक कहाण्या आहेत. माझी माय जमनाबाई ही अत्यंत धाडसी, गड्ड्याप्रमाणेच काम करणारी, 'दिसायला गोरी पण तोंडात सुरी' अशी उपाधी मिळालेली. बोलूनबोलून व भांडून किस्स काढणारी. एकंदरीत शक्यतो कुणी खेटायचे नाही. म्हणजे कारण नसतांनाही भांडण उकरून काढणारी म्हणून सहसा कुणी नादी लागणे टाळत असे. पण तिथे कुणी तिच्या तोडीचे न्हवते असेही नाही. कारण या ठिकाणी सर्वच्या सर्व लोक कामानिमित्ताने एकत्र आलेले, पण सर्वजण गुण्यागोविंदाने मिळून मिसळून वागायचे.

ब. माझा बापू

माझा बापू कचरू हा उंच, धिप्पाड, पिळदार मिशी, पहेलवानी छाती, रांगडा, दिसायला देखणा, बोलण्यात जरब बसवणारा, आवाजात खनकपणा व कोणतेही काम अंगमेहनतीने पूर्ण करणारा, अंगात हत्तीचे बळ घेऊन फिरणारा, पण पुढच्या माणसाला मानसन्मान देणारा होता. हातात तंबाखू घेऊन चोळूनचोळून त्या तंबाखूचा बुग्गा झाला की टाळी वाजवल्यागत करून मोठा भाग फेकून द्यायचा व बुकटी बोटाने धरून डाव्या हाताच्या बोटांनी खालचा ओठ समोर ओढून गालाच्या एका भागात दाताच्या पलीकडून टाकायचा व ओठांवर आलेले तंबाखूचे कण जिभेने थूं-थूं करून बाहेर फेकायचा. आणि रोज कामावरून येताना एकतरी पॅक भूमय्याच्या अड्ड्यावरून मारून यायचा.

त्या काळी मिल म्हणजे हजारो लोकांना पोसणारी, त्यांचे संसार चालवणारी, अनेकांना शहरात आणणारी प्राणवाहिनी तथा अन्नवाहिनी होती. उस्मानशाही मिल म्हणून ही निजामाच्या काळात १९२५ मध्ये सुरू झाली. सहा ते सात रुपये रोजंदारीवर लोक काम करायचे. १९७१-७२ मध्ये ही मील बंद पडली होती. पण काही दिवसांनी ती पुन्हा एकदा सुरू झाली. जवळपास २५ खाते या मिलमध्ये होते. १९७१ मध्ये या मिलचे नांदेड टेक्सटाईल्स मील असे नाव बदलण्यात आले. सुमारे बारा हजार लोकांचे संसार चालवणारी ही अन्नवाहिनी २००५ मध्ये जी बंद पडली ती कायमचीच.

मिलच्या लोकांना त्यावेळी तीन शिफ्टमध्ये काम होते. सकाळी सात ते तीन, दुपारी तीन ते रात्री अकरा आणि रात्री अकरा ते सकाळी सात अशी आठ तासांची कामाची पाळी असायची. मिलपासून हे ठिकाण अगदी जवळ होते. पायी पाच ते दहा मिनिटात जाता येई. म्हणून मिल कर्मचाऱ्यांसाठी ही आजूबाजूची जागा मिल प्रशासनाने गुरुद्वारा बोर्डाकडून ९० वर्षाच्या लीजवर घेतली होती. अशा ठिकाणी माझी जमनामाय व कचरूबापू यांनी संसार थाटला होता. वर्षामागून वर्ष जात होती, पण यांच्या पोटी मुल होत न्हवते. अनेक गंडे झाले, दोरे झाले, वैदू झाले, त्याकाळात मूल व्हावे यासाठी कुणी डॉक्टरांकडे जात नसे. बाहेरचेच उपाय करायचे. त्यातल्यात्यात माय आणि बापू दोघेही निरक्षर. त्यांना लिहिता वाचता येत न्हवते. शिक्षण म्हणजे काय याचा गंधही न्हवता. कारण आमच्या घराण्यात अठराविश्व दारिद्र्य असल्याने कुणी शिक्षण शिकण्याचा प्रश्नच न्हवता.

क. हिरा आजी

माझी आजी हिराबाई, ही अंगाने अतिशय काटक, कणखर, उंच पण शेलाटीसारखी सडपातळ. रोज लाकडाचे भारे आणून विकायची. त्या काळी डंकीन (नदीवरून कारखान्यासाठी पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी) प्रसिद्ध होती. ती आजही भग्न अवस्थेत पहायला मिळते. याच डंकिनीतून मिलसहित आजूबाजूच्या नगरांना पाणी पुरवठा व्हायचा. डंकीनच्या पलीकडे सर्व जंगल होते. काटेरी झुडपेच झुडपे होती. ती जंगलात जातांना सोबत एक कुऱ्हाड, एक विळा व लाकडाचा भारा बांधण्यासाठी दोरी न्यायची. सोबत एखादी बाई असणे आवश्यक होते, कारण भारा उचलून देण्यासाठी कुणीतरी लागत असे. भारा बांधल्यानंतर कुऱ्डाड व विळा ती भाऱ्यात खोचायची आणि एका हाताने ती सोबतिनीचा भारा डोक्यावर ठेवण्यासाठी मदत करायची. त्या वेळी गोदावरी नदीत पलीकडच्या गावातील लोकांना ये-जा करण्यासाठी टोकरा (पाण्यातील नाव, होडी, नौका) होता. कधी कधी आजी नदीच्या पलीकडे जाऊनसुद्धा लाकडांची मोळी त्या टोकऱ्यात टाकून आणायची.

भारा डोक्यावर आणून ती मिलच्या जवळ चौरस्ता असलेल्या ठिकाणी 'टाकीला', तो भारा विकेपर्यंत बसायची. आलेल्या पाच सहा रुपयामध्ये साखरपत्ती, दाळ, गोडंतेल इत्यादी आणायची. त्या काळी रॉकेलचे स्टोव्ह

थोडेफार पैसे असलेल्या लोकांकडेच असायचे. गॅस सिलिंडरचा शोध अजून लागला न्हवता. लाकूड व गोवऱ्या यांच्यावरच स्वयंपाक होत असे. प्रत्येकाच्या घरात चूल असे. झोपड्यातून धूर निघून जात असे. एकदम एअर कंडिशनर झोपडी असायची. धुराने झोपडीची सर्व पाचट व लाकडे काळीभोर होऊन जात. चुलीची उडालेली राख भाकर आणि भाजीत पडत असे. तेव्हा त्या भाकर-भाजीचा वेगळाच गंध यायचा.

माझा जन्म झाला तेव्हा घटं बसले होते आणि भर अमावस्येला माझा जन्म झाला. असे आजीने मला सांगितले होते. हिरा आजीनेच मायचे बाळंतपण केल्याचे माझ्या माय व आत्याकडून मला कळाले. हिरा आजीला नस (तपकीर) ओढायची सवय होती. एका कपड्याच्या पुंजक्यात ती दोनएक रुपयांची नस आणायची. जेव्हा तलफ येई तेव्हा अंगठा व तर्जनीने पुंजक्यातून दोन बोटाच्या चिमटीत नस धरायची व दोन्ही नाकपुड्यात ठेवून जोरात मध्ये ओढायची. कधी कधी तिला इतका जोराचा ठसका लागायचा की, शिंकेबरोबर नाकातून फवारा झोपडीभर पसरायचा.

आजी कधीकधी भाकर करताना मी तिच्या चुलीजवळ बसायचा. ती हातावरच्या भाकरी करायची. चपाती फक्त थोडेफार पैसे असणाऱ्यांकडेच होत असे. आम्हाला मात्र एखादा सणवार असला तरच जाडच्या जाड पुरण घातलेल्या पोळ्या, गुळाचे आळण व चिंच घातलेली अगदी पातळ आमटी मिळायची. एरव्ही भाकर आणि मटन किंवा दाळ असा स्वयंपाक असे. कधी कधी स्वयंपाक करतानांच आजी परसांकडंला जायची व परत येऊन हातावर माती टाकून पाण्याने हात धुवून तशीच भाकरी करायला बसायची. एखाद्या वेळेला चुलीवर भाकर ठेवून तशीच ती ईराकतीला (लघुशंका) जात. ती येईपर्यंत त्या भाकरीचा कोळसा होवून जायचा.

मी आजीला म्हणायचो. ''आजी मला लई भूक लागली भाकर दे की'' ''थोडं थांब रं लई वचवच करू नगस'' असे म्हणून ती आपल्या हातातील भाकर तव्यावर धाडकन टाकायची. अन् चुलीला जाळ लावायची. जर भाकरी करताना तिला नस ओढण्याची तलफ आली, तर दोन बोटांच्या चिमटीत कमरेला खोचून असलेल्या पुंजक्यातून नस काढायची आणि नाकाच्या दोन्ही डाव्या आणि उजव्या नाकपुड्यांसमोर नस ठेवून नाकाने जोरात आतमध्ये झुरका ओढायची. अन् तव्यावरील भाकर ती उल्तनीने पलटायची. जर अशा

वेळेला शिंक आली तर ती भाकरीवरच फवारा हाणायची व त्याच नसंच्या हाताने भाजलेली भाकरी दुरडीत टाकायची आणि नाकाला आलेले पाणी बाजूला तोंडकरून शिंकरायची व हात लुगड्याला पुसून दुसरी भाकरी करण्यासाठी पिठात पाणी टाकून पीठ चुरायची. थोड्या वेळाने एका भाकरीचे चार तुकडे करून भाजी ताटात टाकून माझ्यापुढं सरकवून 'गिळ' म्हणायची.

बरेच दिवस आम्ही गुरुद्वारा लंगरचे शिळेपाते पोळ्या, भाज्या खाऊन गुजरान करायचो. आमच्या भीमघाट येथील बऱ्याच घरी हे गुरुद्वाराचे जेवण यायचे. आमच्या एका नातलगाकडून माझी हिराआजी दोन भाज्या, भात, चपाती, कढी इत्यादी आणत असे. गुरुद्वाऱ्याचे हे जेवण आम्ही बरेच दिवस खाल्लेले आहे. गुरुद्वारा लंगरमधून अनेक भुकेल्या लोकांना अन्न दिल्या जायचे. ते आजही अविरतपणे चालू आहे. या ठिकाणी अनेक शीखधर्मीय लोक संपूर्ण देश-विदेशातून येतात. गुरुतागद्दी काळात तर जवळपास एक महिना शहरात विविध ठिकाणी कॅम्प लावून नांदेडच्या सर्व लोकांना अन्नदान देण्याचे महान कार्य गुरुद्वाराकडून झाले आहे.

तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब नांदेडचे मुख्य गुरुद्वारा आहे. आणि ते शिखांच्या पाच पवित्र स्थळांपैकी एक आहे. हे असे स्थान आहे, जेथे श्री गुरुगोविंद सिंघजींनी आपला शेवटचा श्वास घेतला. नांदेड शहरात मध्यभागी गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर हा गुरुद्वारा वसला आहे. श्री मनमोहन सिंह हे पंतप्रधान असतांना व अशोकरावजी चव्हाण मुख्यमंत्री असतांना या गुरुद्वाऱ्याचा व नांदेडचा खऱ्या अर्थाने विकास झाला, असे म्हणता येईल. गुरुद्वाऱ्याची निर्मिती पंजाबचे महान शासक महाराज रणजितसिंहजींनी १८३० ते १८९१ दरम्यान केली. गुरुद्वाऱ्याच्या आत दहाव्या गुरूंचे मर्त्य अवशेष व समाधी आहे. येथे अनेक प्रकारची शस्त्रे प्रदर्शित होतात. होळी व दसऱ्याच्या दिवशी नांदेडात शिखांची भव्य मिरवूणक निघते. अशा या गुरुद्वाऱ्याने आम्हाला व आमच्या सारख्यांना बरेच दिवस जगवले आहे.

आमची परिस्थिती चांगली नव्हती. कधीकधी माझी टाळू भरण्यासाठी तेलही नसायचे. तेव्हा माय स्वतःच्या दुधाने किंवा घरात असेल तर गोडतेलाने टाळू भरायची. पुढे मी सहा-सात वर्षांचा असतानासुद्धा माय माझ्या डोक्याला गोडंतेल लावायची. डोक्याला हे तेल लावल्यामुळे केस चिपचिप व्हायचे. दिवसभर मातीत खेळत असल्यांमुळे केसांवर धुळ बसायची. रोज अंघोळ

करायचा कंटाळा असल्यामुळे कधी चार दिवसाला तर कधी आठ दिवसालासुद्धा मी अंघोळ करायचा. त्यामुळे केसांमध्ये उवा आणि लिक्का व्हायच्या. दिवसभर काही वाटायचे नाही. पण रात्री डोके खाजवून खाजवून डोक्यात जखमा व्हायच्या. झोपच यायची नाही. कधीकधी माय वेळ मिळाला तर डोक्यातल्या उवा काढून नखावर मारायची. नखावर उवा मारल्यामुळे तिची नखे नखपॉलीश लावल्यागत दिसायची. एवढ्या उवा त्या रक्त पिऊन बलवान झालेल्या असायच्या.

एखादे दिवशी अंघोळ केली की खूप चांगले वाटायचे. दिवस ताजां तवाना जायचा. भांग काढून मी आज आंघोळ केली आहे. असे प्रत्येकाला जणू दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करायचा. कारण प्रत्येकाला माहीत होते की, मी अंघोळच करीत नाही म्हणून.

स्वच्छता ही माणसाच्या जीवनाला, व्यक्तिमत्त्वाला प्रसन्न ठेवते. घरातील स्वच्छता ही घरातील वातावरण आल्हाददायक ठेवण्यास साह्यभूत ठरते. तशी मनाची स्वच्छता हा आपल्या आजूबाजूचा सामाजिक परिसर, एकमेकांमध्ये प्रेम, जिव्हाळा, स्नेहभाव वृद्धिंगत करण्यास मदत करते. म्हणून माणसाने बाह्य स्वच्छतेबरोबरच अंतर्मनाची स्वच्छताही करावी.

तर मी.. हिराआजीबद्दल सांगत होतो. लाकडाचा भारा घेऊन येताना आजी पुरती वाकून जायची व काळी ठिक्कं पडायची. हिराआजी म्हणजे डोळ्यात भरण्यासारखी मूर्ती. आज्या नसल्यामुळे ती स्वतंत्र होती. एक मुलगी धुरपता, एक मुलगा, सून माझी माय म्हणजे जमनाबाई, असा संसार होता. त्या वेळी मिलमध्ये बदली पाळी असायची. कधी काम लागायचे तर कधी परत घरी यायचे महिन्याकाठी जेवढे दिवस भरले तेवढेच पैसे मिळायचे. महिन्याकाठी जेमतेम नव्वद ते शंभर रुपये भेटायचे. एका दिवसाला सहा ते सात रुपये रोज असायचा. मिलच्या कर्मचाऱ्यांना मिलमध्ये आहे म्हटल्यावर किराणा दुकानदार पाच ते दहा रुपयांपर्यंत उधारी द्यायचा पण पुढच्या महिन्यात काम न लागल्यामुळे ती उधारी वाढतच जायची. कधीकधी तर महिना रिकामाच जायचा. बाप घरात झोपूनच राहायचा पण दुसरे कोणते काम करायचा नाही.

इकडे हिराआजीचा लाकडाचा भारा लोक एवढे पाडून मागायचे की तो भारा ती कंटाळून घरी घेऊन यायची. कारण दिवसभर एवढी गाढव मेहनत

करायची की, सर्व अंग काट्यांनी सोलून निघायचे. जागोजागी काटे घुसल्यामुळे रक्तबंबाळ व्हायची. वीस ते पंचवीस जागी रक्त निघालेले असायचे. सोबत फाटलेल्या लुगड्याचे कपडे घेऊन जायची, जेणेकरून एखादेवेळी जास्त रक्त निघत असेल तर त्याला पट्टी करण्यासाठी त्या कपड्याचा उपयोग होई. एवढ्या मेहनतीने आणलेला लाकडांचा भारा भाव पाडून मागल्यामुळे रागारागाने ती तो घरी घेऊन यायची. जर भारा विकला, तर ज्याने लाकडांचा भारा घेतला आहे त्या माणसाच्या घरी तो लाकडांचा भारा नेऊन टाकावा लागे. माझ्या जन्मानंतरही अनेक वर्षं हा कार्यक्रम चालू होता. हे सर्व मी पाहिलेले आहे. एका लाकडाच्या भाऱ्याने संसार चालत नव्हता. म्हणून मायला पण लाकडे आणण्यासाठी आजी घेऊन जायची.

इकडे बापू काम लागले तर जायचा नाहीतर घरात झोपून राहायचा. घरात काही नसले तरी कुणाकडं मागायला जायचा नाही. सर्व भिस्त मिलच्या बदली कामावर. हे बदली काम म्हणजे जर एखादा कायम कर्मचारी त्या दिवशी कामावर आला नाही तर त्या जागी दुसऱ्या कर्मचाऱ्यास तिथे काम मिळे. अशात दोन दिवस, जेमतेम पाच दिवस, कधीकधी पंधरा दिवस, भरत असत. खरेतर आजीच घराची तारणहार होती.

एक वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे वर्ष गेले. वर्षामागून वर्षं जात होती; पण मूल होत नाही म्हणून बापू टेन्शनमध्ये असायचा. घरात चिडचिड करायचा. कुठला तरी राग काढून मायला मारायचा. कडाक्याचे भांडण व्हायचे. वातावरण ठीक नसायचे. एकंदरीत घरात जिव्हाळा, प्रेम हे नव्हतेच. मिलमध्ये जाताना वाटेत भूमय्याचे दारूचे दुकान होते. मिल सुटल्यावर भूमय्याच्या अड्ड्यावर लाइन लागायची. दारू पिणाऱ्यांची गर्दीच गर्दी असायची. जणूकाही एखादी जत्राच भरली की काय? असे भूमय्याच्या अड्ड्यावरून लोक दारू पिऊन झिंगत निघायचे. विशेष म्हणजे त्या वेळी रस्त्यावर एकही कुत्रा दिसायचा नाही. एवढे लोक झुलत-डुलत यायचे की, कदाचित कुत्र्यांना पण वाटत असेल की 'ही स्वारी आपल्यावर पडली तर आपलेच काही खरे नाही.' त्यामुळे भूमय्याच्या वारकऱ्यांना रस्ता साफ करून देत असावेत. असे मला वाटे. त्यामुळे हालती झुलती भूमय्याची जत्रा, असे मिश्कीलपणे लोक म्हणायचे. काही लोक तर मी असेही बघितलेत की प्यायची चाराण्याची अन् अभिनय करायचा बाराण्याचा. म्हणजे अड्ड्यातून मस्त निघायचे अन् घर आले की पूर्ण रस्ताभर झुलत-डुलत

यायचे. याचे नेमके काय कारण असावे? हे मला आजही कळले नाही. मी बरेचदा अनेक लोकांना विचारत असे, 'असे का?' तर कोणी म्हणायचे की, 'प्रतिष्ठा'. म्हणजे जो दारू पितो तो प्रतिष्ठित असतो. त्याच्याकडे जास्त पैसे असतात. असेही म्हणायचे. पण मला नंतर असे कळले की दारुड्याच्या घरात तर अठराविश्व दारिद्र्य. त्याची चूल कधी कधी पेटायची अन् जो दारू पीत नाही त्याच्या घरी लेकरं बाळं किमान पोटभर तरी जेवण करायची. पण एवढे एक समजले की, दारू ही माणसांच्या व्यक्तिमत्त्वाला, संसाराला मारक आहे. ती पिल्याने माणसांचा राक्षस होतो.

दरम्यान, आत्याचे लग्न झाले किसन वाघमारे यांच्याशी. धुरपताबाई म्हणजे माझी आत्या ही भीमघाटलाच राहायची. तिचाही नवरा मिलमध्येच होता, पण तो बाज विणणे, किंवा सुतारकीची कामे करीत असल्यामुळे मिलमध्ये बदली काम लागले नाही तरी, उपाशी राहत नव्हते.

◆

नवी संहिता... नवा आशय...

स्फिंक्स

डॉ. रॉबिन कुक

अनुवाद

डॉ. प्रमोद जोगळेकर



एका विलक्षण खजिन्याचा लागला एरिला बॅनरला सुगावा... आणि मग सुरू झाला थरारक पाठलाग आणि निर्घृण हत्यांची मालिका... प्राचीन खजिन्यासाठी अर्वाचीन काळात रंगलेला रक्तरंजित, उत्कंठावर्धक संघर्ष

किंमत : ४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. ।

नवी संहिता... नवा आशय...

द हंग्री टाइड

अमिताव घोष

अनुवाद

सुनील करमरकर



निसर्गभान आणि जाणिवांचं दोलायमान वास्तव स्पष्ट करणारी सुंदरबनच्या नयनरम्य काठावर घडणारी बहुचर्चित कादंबरी...

किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

तेलगी स्कॅम
रिपोर्टरची डायरी

संजय सिंह

अनुवाद

मंजिरी धामणकर



डान्सबारमध्ये एका वेळी ८४ लाख उडवणारा तेलगी ते संपूर्ण यंत्रणेला भ्रष्टाचाराने पोखरणारा घोटाळेबाज... तेलगी महाघोटाळ्याची पोलखोल करणारा एका शोधपत्रकाराचा थक्क करणारा आँखोदेखा हाल...

किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



ज्ञानाई सावित्रीबाई फुले

डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर

ज्ञानाई सावित्रीबाई फुले यांच्या काव्यजाणिवा आणि त्यांचं समग्र चिंतन यांवर प्रकाश टाकणारं दर्जेदार चरित्र

१८१८ चा काळ

इसवी सन १८१८ साली पेशवाईची अखेर झाली व इंग्रज राज्याची सुरुवात झाली. राज्य वाचवण्यासाठी दुसऱ्या बाजीरावाला भट-भिक्षुकांनी फसविले. सरकारी खजिन्यातून ब्राह्मण भोजने व दक्षिणावाटपाच्या पुण्यसंचयामुळे आपले राज्य वाचेल अशी बिचाऱ्यांची भाबडी समजूत होती. ओंजळीने भरून सुवर्णमुद्रा वाटायला बाजीरावाने मागेपुढे पाहिले नाही. पेशवाईमध्ये बेबंदी व मनमानी शिगेला पोहोचली होती. स्वत:च्या

शारीरिक भुकेसाठी बाजीरावांनी भल्याभल्या घराण्यांतील स्त्रियांची अब्रू धुळीला मिळविली. कितीतरी स्त्रियांनी बेअब्रूच्या भीतीने आत्महत्या केली. दुष्काळामध्ये शेतसारा थकबाकीसाठी गरीब शेतकऱ्याच्या घरा-दारावर नांगर फिरवला जाई. शेतकऱ्यास उघडे करून त्याच्या पाठीवर अथवा नाजूक भागावर चटके देण्यासही बाजीराव मागेपुढे पाहत नव्हता. फक्त ब्राह्मणांनीच कपाळावर आडवे गंध लावायचे. एकदा काही सोनारांनी आडवे गंध लावले तर त्यांना शिक्षा म्हणून लोखंडी शिक्के भट्टीत लाल तापवून सोनारांच्या कपाळावर कायमचे उमटवले गेले. एकदा सुताराने एकटांगी धोतर नेसले म्हणून त्याचा कुल्लाच कापून टाकण्यात आला.

अशा काळात गोर-गरिबांचे व अस्पृश्यांचे अतोनात हाल होत होते. दलितांना दिवसा बाहेर पडण्याची मुभा नव्हती. कारण त्यांची सावली लांबवर पडत होती. त्यांना अंधार पडल्यावरच बाहेर पडता येत असे. अस्पृश्यांच्या सावलीचा विटाळ होईल म्हणून त्यांना जनावरासारखे बडवण्यात येई. धर्म बुडाला; पाप वाढले असे म्हणून पेशवाईच्या काळात हरिजनांच्या पावलांचे ठसे उमटू नयेत म्हणून त्यांच्या पाठीला खराटा व थुंकण्यासाठी गळ्यात गाडगे बांधावे लागे. अशी कडक बंधने न पाळणाऱ्यांना जीव घालवून घ्यावा लागे. पुण्याचे वैभव व सत्ता संपून ब्राह्मणी राज्याचा अस्त होऊन जणू मोठे संकटच कोसळले होते. शेतकऱ्यांना नि शेतावर राबणाऱ्या कामकऱ्यांना पेशव्यांचे अधिकारी व त्याचा दत्तक भाऊ अमृतराव हे छळून हैराण करीत असत. मागितलेली रक्कम नाही मिळाली तर त्यांच्या मुलांच्या अंगावर उकळत्या कढईतील तेल ओतले जाई. तवे तापवून त्यावर शेतकऱ्यांना उभे केले जात असे. शेतकऱ्यांच्या पाठीवर अमानुषपणे मोठमोठे दगड ठेवण्यात येत असत. त्यांना ओणवे करून त्यांच्या नाकाखाली मिरचीचा धूर देण्यात येई. कानात व बेंबीत बंदुकीची दारू घालून ती उडवीत. साहजिकच शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत केविलवाणी झाली होती. शेतकऱ्यांची मालमत्ता वाटेल तेव्हा ताब्यात घेतली जात असे. त्यांच्या डोक्यावर किंवा छातीवर धोंडा ठेवून किंवा त्यांना ओणवे करून पैसे वसूल करत. त्यांच्या गुरांचा लिलाव, शेती जप्त करणे यामुळे त्यांना सावकार म्हणजे साक्षात यमदूतच वाटे. शेवटी हे गरीब लोक खंगून/खंगून दारुण निराशेने देह ठेवीत किंवा हाय हाय करीत प्राण सोडीत. अस्पृश्यांना तर कंबरेस झाडाची फांदी बांधून; दिवसा माणसाची सावली मोठी

पडत नसे तेव्हा पुण्यात फिरण्याची मोकळीक असे.

पुण्यातील वातावरण गतयुगातील कोणत्याही कुजत गेलेल्या साम्राज्याच्या वातावरणाप्रमाणे प्रजाहितद्रोही, नीतिभ्रष्ट झाले होते. अब्रुदार आणि नेक सरदारांवर पुणे सोडून जाण्याची वेळ आली होती. या दुर्गुणांचे दृश्य इतके भयानक अन् वाईट होते की, रॉबर्टसन नावाच्या पहिल्या इंग्रज जिल्ह्याधिकाऱ्याला इतके नीतिभ्रष्ट झालेले लोक पाहून धक्काच बसला होता.

अनेक जुन्या बुरसटलेल्या कल्पनांनी, जुन्या आचारविचार व रीतिरिवाजांनी समाजाची अवस्था कुंठीत झाली होती. समाजात राहाणाऱ्या लोकांना दुःख आणि अनंत अडचणींना तोंड देतच जीवनाची मार्गक्रमणा करावी लागत होती. प्रगतीचा कोणताच मार्ग मोकळा नव्हता. समाज अंधारयुगातच वावरत होता. लोकांना कोणतेच ज्ञान अवगत नव्हते. स्त्रियांची अवस्था तर अत्यंत बिकट होती. त्यांना शिक्षण घेण्याचाच नव्हे तर घराबाहेर पाऊल टाकण्याचाही अधिकार नव्हता. स्त्रियांची अवस्था दावणीला बांधलेल्या जनावरांपेक्षाही वाईट होती. समाजातील फार मोठा वर्ग निरक्षर होता, जो वाचू-लिहू शकत नव्हता.

भारतातील परंपरावादी समाज संस्थांची तसेच त्यांच्या नियमांची पकड हजारो वर्षे लोकांच्या मनामध्ये पक्की बसलेली होती. या समाजात जन्मसिद्ध हक्क, उच्च-नीच भेद हे परमेश्वरी कृपेने व माणसांच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत म्हणून त्याविरुद्ध बंड करणे किंवा प्रयत्न करणे हे महापाप आहे अशी समजूत होती. येथील जनमानसात अनेक वर्षे रुजलेली या महापापाची, अपवित्रतेची भीती कायमचे घर करून बसलेली होती. जुने आचारविचार, जुन्या रूढी, कर्मकांड, जपजाप्य, पूर्वसंचित, पूर्वजन्म, ईश्वरी संकेत, स्वर्ग-नरक अशा भोळ्या कल्पना प्रत्येकाच्या मनात ठाण मांडून बसलेल्या होत्या. बहुजन समाज थंड गोळ्यासारखा पडून होता.

इंग्रज आले अन् स्वातंत्र्य गेले. पराक्रमाची परंपरा खंडित झाली होती. थोरल्या महाराजांपासून ते त्यांचे स्वामित्व मान्य करणाऱ्या प्रतापी बाजीरावांपर्यंतची सळसळत्या आणि धगधगत्या रक्ताची दौड थांबली हेती. विकलांग हिंदू समाज थंड गोळ्यासारखा पडून होता. मोडकळीस आलेल्या वर्णव्यवस्थेच्या गावगाड्यात जातीयतेची विभागणी होऊन समाज दगडाच्या न पावणाऱ्या देवासाठी नैवेद्य करण्यातच दंग झाला होता. वास्तवाचे भान नसल्यामुळे माणसे माणसांशी माणसांसारखी वागत नव्हती. स्त्री म्हणजे पायाची दासी; ती दलित व जनावरासारखे जिणे जगत होती.

अशा प्रकारे सर्व समाजाचे नैतिक जीवन कुजून, सडून गेले होते. सांस्कृतिक गुणांचा ऱ्हास झाला होता. धार्मिक वातावरण सडले होते. तो कालखंड अत्यंत ऱ्हासाचा ठरला होता. १८१८ साली पेशवाई कोलमडून पडली तेव्हा त्यांच्या सैनिकांनी अवघ्या छत्तीस तासांत इंग्रजांची नोकरी पत्करली. पेशव्यांचे राज्य गेल्यावर स्त्रियांनी उद्‌गार काढले की, आता पुण्यात बाजीरावाचे राज्य नाही. बरे झाले! चांगले मेल्याचे तळपट झाले. मोठा चांडाळ होता तो. पेशव्यांची ती भयंकर, प्रजाहितद्रोही अन् जुलमी राजवट संपुष्टात आली. आता जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला.

पेशव्यांच्या राज्यात ब्राह्मणांचे प्रस्थ माजले, त्यांचे जातिवर्चस्व अमर्याद वाढले. इतकेच नव्हे तर त्यांनी आपला राज्यकारभार न्यायाने आणि दक्षतेने पार पाडला नाही; त्यामुळे स्वराज्याचा नाश झाला असे लोकहितवादींना वाटल्यामुळे 'ब्राह्मणांनी देश बुडविला,' असा सडेतोड अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. स्वराज्याचा अस्त झाल्यावर मराठी साम्राज्याची राजधानी पुण्यनगरी अगदी पुण्यहीन, तेजोहीन झाली होती. अपवित्र अशा परकीय साम्राज्याच्या आधिपत्याखाली पुणे हे परकीय साम्राज्याचे दास झाले. अशा प्रकारे महात्मा फुले यांच्या पूर्वी आपल्या महाराष्ट्राची सांस्कृतिक, राजकीय नि सामाजिक परिस्थिती होती.

◆

नवी संहिता... नवा आशय...

चंबळेच्या पलीकडे

स. शं. देसाई

महादजींच्या निष्ठेची आणि वीरतेची
विस्मयकारक गाथा



किंमत : ७२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



विजय

भा. द. खेर

नियतीचे फासे, कधी पडतात उलटे...पण नियती आणि मूल्यं यांच्यातील संघर्षात जिंकतं कोण? विजय, नीला, अरविंद की निर्मला?... भावनिक संघर्षाचं चित्रण करणारी उत्कंठावर्धक कादंबरी

''**तुमच्या** पुण्यात बघण्यासारखं असं काय आहे?'' असा प्रश्न तुम्ही कोणत्याही पुणेकराला करा, की लगेच तो तुम्हाला पर्वती, शनिवारवाडा यांसारख्या इतिहास प्रसिद्ध स्थळांचे वर्णन करून सांगेल. एम्प्रेस, बंड, बोटॅनिकल वगैरे बागा पाहून येण्याबद्दल तो तुम्हाला

शिफारस करेल. कॉमनवेल्थ, सर परशुरामभाऊ कॉलेज आणखी कितीतरी इमारतींची मनसोक्त स्तुती करून 'त्या बघण्यास विसरू नका' असेही तो तुम्हास बजावेल आणि सरतेशेवटी म्हणेल, ''आमच्या पुण्यातलं 'प्रभातनगर'देखील मोठं बघण्याजोगं आहे. आणि प्रभातनगरला जाणारच असाल तर मधे रस्त्यावरच अगदी प्रभातनगरानजीक 'विजय व्हिला' नावाचा बंगला आहे, तो अवश्य पाहा. मोठा सुंदर आहे तो!''

आणि खरोखरच कोणीही मनुष्य प्रभात रोडवरून प्रभातनगरकडे जाताना वाटेवर लागणाऱ्या त्या बंगल्यासमोर थोडा वेळ थबकून त्याच्याकडे पाहून, त्या छोट्या टुमदार बंगल्याच्या आगळ्यावेगळ्या देखणेपणाने भारावून पुढे जात असे.

आता त्या बंगल्याच्या सौंदर्याचे सार कशात आहे, याबद्दल मात्र कधीच कोणाचे एकमत होत नव्हते. कोणाला वाटेल त्या बंगल्याभोवती तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या व सुगंधाच्या फुलांची बाग आहे, म्हणून त्या बंगल्याला सौंदर्य प्राप्त झालेलं आहे. कोणी बंगल्याच्या सौंदर्याचे श्रेय तेथे सतत थुईथुई उडत असलेल्या व क्वचितप्रसंगी सूर्याची किरणं पडून इंद्रधनुष्याची शोभा निर्माण करणाऱ्या प्रेक्षणीय कारंज्याला देईल. तर काहींना वाटेल की, बंगल्याच्या भिंतीवर रंगसंगतीत साधलेल्या कौशल्यात किंबहुना, बंगल्यावर एका संगमरवरी दगडावर हिंदमातेचे चित्र काढून तिच्या हातातील ध्वजावर कोरलेल्या 'विजय व्हिला' या नावातच एक प्रकारची जादू भरली आहे व त्यामुळेच बंगल्याला खरे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

काही असले तरी तो बंगला सुंदर आहे, या एका गोष्टीबद्दल मात्र कोणाचेच दुमत नव्हते.

रोज सकाळी सातच्या सुमारास 'लॉ कॉलेज'चे विद्यार्थी जेव्हा त्या बंगल्यावरून जात, तेव्हा ते अगदी निराळ्याच दृष्टीने त्या बंगल्याकडे बघत. कारण नेमकी त्याच वेळी नीला बागेतील फुले तोडण्यासाठी म्हणून बागेत इकडून तिकडे फिरताना दिसे. अशा वेळी 'बंगल्याच्या सौंदर्याचे इंगित कशात आहे?' असा प्रश्न जर त्या विद्यार्थ्यांना कोणी केला असता तर त्यांच्यापैकी प्रत्येक जणाने अगदी वेळ न गमावता, बागेतील त्या चालत्या बोलत्या सौंदर्याकडे बोट दाखवले असते.

एके दिवशी सकाळी, ते विद्यार्थी असेच नेहमीप्रमाणे त्या बंगल्याकडे

बघत चालले असताना, नीला तिच्या रोजच्या नियमाप्रमाणे बागेतील फुले तोडत होती. फुलांमधले गुलाबाचे एक टपोरे फूल तिने तिच्या अंबाड्याच्या किंचित उजव्या बाजूस खोवले होते. त्याच्याकडे बघत एक विद्यार्थी सर्वांना उद्देशून उदगारला, ''बोला, त्या फुलानं तिच्या केसांचं सौंदर्य वाढवलं आहे की तिच्या केसांनी त्या फुलाचं सौंदर्य वाढवलं आहे?''

त्या प्रश्नाबद्दल त्यांच्यामध्ये विनोदाने थोडी उलटसुलट चर्चा झाली. नंतर त्यांपैकी एक जण म्हणाला, ''अरे मला एक शोध लागला आहे!''

सर्वांनी एकदम विचारले, ''काय? कसला शोध?''

मग तो पहिला विद्यार्थी म्हणाला, ''तिच्या नावाचा!''

पुन्हा सर्वांनी त्याच्याकडे अगदी उत्सुकतेने प्रश्नार्थक मुद्रेने बघितले. मग त्यानेही सर्वांची उत्सुकता फारशी वाढू न देता म्हटले, ''तिचे नाव नीला आहे.''

आणि थोडा वेळ थांबून तिच्या नावावर भाष्य करण्यासही तो विसरला नाही. तो म्हणाला, ''खरंच, तिच्या निळ्या डोळ्यांकडे बघितलं म्हणजे तिच्या नावाची सार्थकता पटते नाही का?''

आणि इतरांचे मत अजमावण्याच्या दृष्टीने त्याने सर्वांकडे दृष्टिक्षेप टाकला. परंतु त्यापैकी एकाने यावर त्याला 'आहे बुवा!'चा नुसता अहेर दिला. पण लगेच तो म्हणाला, ''नको, तिचं लग्न झालं आहे बरं का?''

''मग त्यात काय झालं?'' दुसरा उद्गारला.

परंतु त्यांच्या या बोलण्यावर आंबट तोंड करून आतापर्यंत गप्प असलेला एक विद्यार्थी म्हणाला, ''अरे, आपण आता आर्ट्स कॉलेजचे विद्यार्थी नव्हेत. तेव्हा आपण आता जरा गांभीर्य अंगी आणलं पाहिजे.''

त्याच्या बोलण्यावर सर्वांनी निरनिराळी टीका केली. सर्व जण त्याच्या 'आजोबा' तत्त्वज्ञानावर कुत्सितपणाने हसले.

अशाच प्रकारची निरनिराळी बोलणी रोजच त्या विद्यार्थ्यांत नीलेसंबंधी चालत. तिला ती नेहमीच ऐकू येत असत, असे नाही. पण तिने जरी ती बोलणी क्वचितप्रसंगी ऐकली तरी तिला त्याबद्दल काहीच वाटत नसे. कारण कॉलेज जीवनात अशा प्रकारची टीका करण्याचा विद्यार्थ्यांना जणू 'पासच' मिळालेला असतो, असे ती समजे. आणि शिवाय, एखाद्या गोष्टीला निष्कारण नसते महत्त्व देऊन, स्वत:च्या मनाला त्रास करून घेणाऱ्या वर्गापैकी ती खचितच नव्हती.

त्या दिवशी नीला नेहमीप्रमाणे जास्तच वेळ फुले तोडण्यात 'गुंग' झाली होती. परंतु फुले तोडण्याऐवजी मधूनच ती जेव्हा थबके, त्या वेळी ती काहीतरी गोड विचार करण्यात गुंतली आहे असे तिच्याकडे बघणाऱ्याला सहज वाटे. त्या दिवशी विजयबद्दल तिचे विचार चालणे व त्यातच फुले तोडण्याऐवजी तिने गुंगून जाणे साहजिकच होते. त्या गोड विचारात ती रंगली असताना आतून एकदम तिला हाक ऐकू आली, ''अगं नीला, ए नीला, तुझं आटोपणार तरी केव्हा बाई? किती उशीर करते आहेस?''

उमाबाईंचे हे शब्द ऐकताच तीही तेथे मग फारशी थांबली नाही व ''झालंच, आले हं!'' असं म्हणून फुलांची परडी घेऊन ती धावतच आत गेली.

हातातील फुलांची परडी खाली न ठेवते तोच उमाबाईंनी तिला विचारले, ''काय गं, चांदीची अत्तरदाणी, गुलाबदाणी बाहेर काढून ठेवलीस का?''

तिने नकारार्थी मान हलवताच उमाबाई पुन्हा म्हणाल्या, ''अगं दुपारी एक-एक मंडळी जमायला लागली म्हणजे त्यांच्याशी बोलण्यात तुला काही सुचायचं नाही. आणि मग सगळी कामं राहून जातील.''

मग मात्र वेळ न गमावता लगेच घाईघाईने ती कामाला लागली.

त्या बंगल्यातील एकंदर गडबडीवरून त्या ठिकाणी आज काहीतरी मोठा समारंभ आहे, असा तर्क जर कोणी बांधला असता तर तो खचित चुकीचा ठरला नसता. आणि खरोखरच त्या दिवशी विजय व नीला यांच्या लग्नाच्या वाढदिवसाचा समारंभ होता.

नीला एक-एक काम करण्यात गुंतली होती खरी, परंतु तिचं मन मात्र विजयबद्दलच्या विचारात पूर्णपणे गर्क झाले होते. किंबहुना, असेच म्हणणे जास्त सयुक्तिक ठरले असते की विजयबद्दल विचार करणे हेच तिचे प्रमुख काम होते व ती करत असलेली बाकीची कामे गौण होती.

तिचे मन गेल्या वर्षाचा आढावा घेत होते. गतवर्षी नक्की या दिवशी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तारखेला विजयचे आणि नीलाचे मुद्राविधान पद्धतीने लग्न झाले होते. पहिल्या प्रथम उमाबाईंनी त्या लग्नपद्धतीला आपली नापसंती दर्शवली होती. परंतु विजयने त्या पद्धतीने लग्न करण्याचा जवळजवळ हट्टच धरला. ज्या गोष्टीत आपला विशेष तोटा नाही अशा क्षुल्लक गोष्टीत, दुसऱ्याचे मन सहसा दुखवायचे नाही असा उमाबाईंचा स्वभाव असल्याकारणाने, त्यांनी तत्काळ त्या लग्नाला आपली संमती दिली होती. विजयसुद्धा हट्टी

स्वभावाचा नव्हता. पण त्याला ती विवाहपद्धती फारच आवडलेली होती. कारण एकतर तिचा आटोपशीरपणा! दुसरी गोष्ट म्हणजे त्या विवाहपद्धतीत असलेली घटस्फोटाची सवलत! आणि जी गोष्ट सारासार विचार करून मनाला पटते, त्या गोष्टीत मनुष्याने आपला हट्ट खुशाल चालवावा, अशा मताचा विजय होता.

त्यांचा तो प्रेमविवाह होता असेही नव्हते. नीला त्याच्या नात्यातली होती व त्यांचे लग्न वडील मंडळींनी लहानपणापासून जवळजवळ ठरवूनच टाकले होते. आणि विशेष हे की लग्न ठरवण्यात उमाबाईंचाच अधिक भाग होता. तेव्हा केवळ मुद्राविधान पद्धतीने त्यांनी लग्न केले, या एकाच गोष्टीबद्दल त्यांच्या मनात त्या दोघांच्याविषयी अढी निर्माण होणे शक्य नव्हते. आणि यदाकदाचित ती निर्माण झालीच असती तर ती पार घालवून टाकण्यास एक कारण लवकरच घडून आले होते. त्या दोघांचे लग्न झाल्यानंतर दोनच महिन्यांनी विजयला वैमानिक खात्यात मोठ्या पगाराची नोकरी लागली होती व त्यामुळे नीला चांगल्या पायगुणाची ठरली होती. अशा स्थितीत त्या दोघांबद्दल उमाबाईंच्या मनात राग राहावा ही गोष्ट खास शक्य नव्हती.

उमाबाई प्रथम का रागावल्या? नंतर विजयने हट्ट धरल्यावर त्यांनी का संमती दिली? आणि विजयला नोकरी लागल्यावर नीला चांगल्या पायगुणाची म्हणून आपले किती प्रकारे कौतुक केले वगैरे गोष्टी नीलेला जसजशा आठवत होत्या, तसतसे तिला त्या गोष्टींबद्दल अनावर हसू येत होते. आणि हसताना नेहमी प्रामुख्याने दिसणारे तिचे वरचे दोन शुभ्र दात आताही मधून मधून दिसत होते. ती जेव्हा हसे, तेव्हा तिच्या निळ्या डोळ्यांत हसरे भाव व्यक्त होत व मग अशा वेळी तिच्याकडे बघणाऱ्याला ती हसताना दिसणाऱ्या त्या दोन शुभ्र दातांकडे बघावे, की ती हसताना तिच्या निळ्या डोळ्यांत जे हसरे भाव व्यक्त होत, त्यांच्याकडे बघत राहावे, असा संभ्रम काही काळ पडत असे. आताही तसा संभ्रम तिच्याकडे बघणाऱ्याला खास पडला असता. परंतु ती त्या मोठ्या दिवाणखान्यात एकटीच होती. आणि रामा गड्याने ''बाईसाहेब, बाईसाहेब!'' म्हणून तिला जेव्हा हाका मारल्या तेव्हा तर तिच्या तोंडावरचे हास्यसुद्धा पार मावळून गेले होते.

आज लग्नाचा वाढदिवस म्हणून गेल्या वर्षी लग्न झाल्याबरोबर एकत्र काढलेला त्यांचा मोठा फोटो ती दिवाणखान्याच्या मध्यभागी टांगण्यात गर्क झाली होती. ज्या ठिकाणी तिला फोटो टांगायचा होता, त्या ठिकाणी काही

केल्या तिचा हात पुरत नव्हता. अशात रामाने तिला एकसारख्या हाका मारण्याचा सपाटा चालवल्याकारणाने ती दिवाणखान्यात आलेल्या रामावर थोडी चिडूनच ओरडली, ''काय रे, कशाला मोठ्याने हाका मारतोस?''

''बाईसाहेब, भाऊ आणि आई आल्या आहेत.''

''खरं का? ही आलेच मी!'' असे म्हणून दिवाणखान्यातून पळतच ती निघाली. पण दाराशी जराशी थबकून रामाला म्हणाली, ''रामा, तो फोटो तेवढा मध्यभागी नीटसा टांग बरं का? माझा मेला हातच पुरत नाही.''

त्या वेळची तिची धांदल पाहून कोणालाही हसू आले असते. स्त्री कितीही मोठी झाली तरी माहेरच्या माणसांबद्दल तिचा ओढा कधीही कमी होत नाही, हे नीलेच्या वागण्यावरून सहज जाणवत होते. तेव्हा त्या वेळी तिचे आईवडील गावाहून आले आहेत असे कळताच ती हातातील काम टाकून तत्काळ ओसरीवर आली. आईला बघताच ती तिच्या अगदी जवळ जाऊन उभी राहिली आणि आश्चर्याने तिच्याकडे बघत म्हणाली, ''अगं, या गाडीला तुम्ही कसे आलात? पुढच्या गाडीला येणार होता ना? मी तर पुढच्याच गाडीला रामाला स्टेशनवर धाडणार होते!''

वास्तविक आईला एकाही प्रश्नाचे उत्तर देण्यास तिने अवसर दिला नाही. इतकेच नव्हे, तर वरील एकाही प्रश्नाचे उत्तर आईकडून तिला आले नाही. तरी तिने आपल्या पुढील प्रश्नांचा भडिमार तिच्यावर करावयास कमी केले नाही. ''प्रवास कसा काय झाला? आईला नेहमीप्रमाणे गाडी लागली किंवा नाही? गंगूवन्सं त्यांच्याबरोबर येणार होत्या, त्या का आल्या नाहीत?'' वगैरे माहिती तिने भराभर तिला विचारली.

या वेळेपर्यंत भाऊ- तिचे वडील- वाहनाचे पैसे चुकते करून घरात आले. मग तेच स्वत: जेव्हा म्हणाले,''अगं नीला, आईला बसू तर देशील की नाही? मग विचार एक-एक माहिती!'' तेव्हा तिने आईला आत नेऊन एका कोचावर बसवले.

सर्वांचा चहा-फराळ झाल्यानंतर नीला आईला म्हणाली, ''खरंच आई, गंगूवन्सं केव्हा येणार हे नाही सांगितलंस? तुमच्याबरोबरच येणार होत्या ना त्या?''

''हो येणार होत्या. पण प्रभाकरपंतांचंही आयत्या वेळी यायचं ठरलं. तेव्हा ते म्हणाले की, मागच्या गाडीनं आम्ही येऊ म्हणून!''

◆

पुस्तकाच्या पानांतून



स्मृतिसुगंध

भा. द. खेर

इंदिरा गांधी, ना. सी. फडके आदी नामवंतांच्या भा. द. खेरांना लाभलेल्या सहवासातून दरवळलेला 'स्मृतिसुगंध'

न परतणारी देवमाणसे

(इंदिरा गांधी)

काय चमत्कारिक योगायोग पाहा! ज्या दिवशी आणि ज्या वेळी इंदिराजींची भीषण हत्या झाली, त्या दिवशी आणि त्याच वेळी माझ्या हातात अभिनंदनाची एक तार पडली. ती तार देणारा पोस्टमन अजूनही माझ्या समोरच उभा होता. त्याला चांगली बातमी आणल्याबद्दल

मी बक्षिसी देण्यासाठी उठणार, तोच इंदिराजींवर गोळ्या झाडल्याचा कालवा उठला. मी दिङ्मूढ होऊन गेलो. माझ्यासाठी चांगली बातमी घेऊन येणारी ती तार मला वैरिणीसारखी भासू लागली.

'हिरोशिमा' या माझ्या कादंबरीला सोव्हिएत लॅण्डचं नेहरू पारितोषिक मिळालं होतं. त्यासाठी माझं अभिनंदन करणारी तार सोव्हिएत लॅण्डच्या संपादकाकडून आली होती; आणि त्याच वेळी नेहरू कुटुंबातील एका तेजस्विनीवर गोळ्या झाडल्याचा कालवा सभोवती उठला होता.

केवढा विसंवाद होता त्या दोन बातम्यांमध्ये? माझ्या आनंदावर विरजण पडलं होतं. माझ्या व्यक्तिगत आनंदाला दुःखाचं नख लागलं होतं. चांगलं आणि वाईट एवढं निकटवर्ती कसं नांदू शकतं, हेच मला कळेनासं झालं. आनंदानं उठू पाहणाऱ्या माझ्या पायांतील शक्ती पार निघून गेली. मन पुरतं मोडावून गेलं. मनाचे पंख पंगू बनले. मनाच्या त्या उद्विग्न अवस्थेत मी तसाच तिथे बसून राहिलो. त्या विषण्ण अवस्थेत माझ्या मनानं १९६८ सालात प्रवेश केला; आणि बराच वेळ तिथेच ते स्थिरावलं.

१९६८ सालचा जानेवारी महिना. २९ तारखेची सकाळची नऊची वेळ. दिल्लीची कडाक्याची थंडी. तापमान ४ अंश सेल्सिअसपर्यंत खाली उतरलेलं. त्या वेळी आम्ही सफदरजंग रोडवरच्या महामंत्र्यांच्या निवासस्थानाजवळच्या पहिल्याच तंबूत बसलो होतो. त्या घरातून इंदिराजींचं केव्हाही बोलावणं येईल, या प्रतीक्षेत आम्ही होतो. आत जाण्यासाठी चवड्यावरच उभे होतो म्हणा ना!

भेटीची वेळ ठरली होती साडेनऊची! परंतु माझ्या नेहमीच्या स्वभावानुसार आम्ही साडेआठ वाजताच तिथे जाऊन ठेपलो होतो. त्यामुळे तिथल्या संरक्षकांनी आमच्याकडे आश्चर्यानं बघितलं, याबद्दल मला मुळीच आश्चर्य वाटलं नाही. माझ्याबरोबर आलेल्या निर्मला कुलकर्णी यांना मात्र त्या संरक्षकांच्या आश्चर्याचा अन्वयार्थ लागला.

निर्मलाताई मला म्हणाल्यादेखील, ''आपण उगाच फार लवकर आलो! अजून तासभर अवकाश आहे! इंदिराजी उठल्याही नसतील!''

आपल्या घारोळ्या टपोऱ्या डोळ्यांत हास्याची छटा आणून नेहमी बोलणाऱ्या निर्मलाताईंचं ते बोलणं ऐकून मी हसलो खरा! परंतु कुठेही ठरलेल्या वेळेपेक्षा तासभर आधी जाणं, यात मला उगाच असं काही

वाटत नाही. अगदी रेल्वे स्टेशनवरदेखील! नाहीतरी स्टेशनवरची विविध दृश्यं शांतपणानं बघायला आपल्याला केव्हा वेळ मिळणार?

या हिशेबानं मी निर्मलाताईंना म्हणालो, ''इथे बघण्याजोगं काय कमी आहे? महामंत्र्यांच्या घरी आपण पुनःपुन्हा थोडेच येणार आहोत?''

मग मी तरी तिथली करड्या व्यवस्थेची दृश्यं बघण्यात गुंगून गेलो.

महामंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर एकूण तेरा तंबू होते. आमची ही भेट स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या संगतीनं झालेली असल्यामुळे त्या तंबूतील अग्रभागी तंबूत बसण्याचा मान आम्हाला मिळाला होता. म्हणजे आम्हाला पहिल्याप्रथम भेट मिळणार होती. त्यामुळे त्या प्रतीक्षेतही मी खुषीत होतो.

सभोवताली मी बारकाईनं निरीक्षण करत होतो. तिथले हिरव्यागार रंगाचे तेरा मजबूत तंबू संगीनधारी सैनिकांप्रमाणे रांगेनं उभे होते. ते दृश्य काहीसं भयप्रद वाटत होतं. त्याशिवाय पोलिसांची आणि सैनिकांची गरज सगळीकडे सुरूच होती.

त्या कडेकोट बंदोबस्ताकडे बघून माझ्या मनात विचार आला, एवढा हा बंदोबस्त हवा आहे कशाला? इंदिराजी या नेहरू कुटुंबातील एक थोर व्यक्ती! नावाप्रमाणेच प्रियदर्शिनी! या देशावर नेहरू कुटुंबाचे देवाप्रमाणे थोर उपकार! मग त्या घराण्याबद्दल अपरंपार प्रेमादर असणाऱ्या लोकांकडून त्यांना धोका कुठून असणार? त्यासाठी कशाला हवा आहे बंदोबस्त?

असले विचार माझ्या मनात चालले असतानाच एका रुबाबदार संरक्षक अधिकाऱ्यानं जवळ येऊन माझं नाव पुकारलं. माझा चेहरामोहरा न्याहाळला. तपासणी केली आणि तो अधिकारी आम्हाला आत घेऊन गेला.

पोर्चमध्येच इंदिराजींची भेट झाली. भेट होताच त्यांचं ते हसणं मला मुळीच औपचारिक वाटलं नाही. नेहरू घराण्याचं निरागस आणि आपलेपणाचं हास्य त्यांच्या मुद्रेवर दिसलं. त्यांना प्रियदर्शिनी का म्हटलं गेलं, या गोष्टीचा उलगडा मला त्या वेळी झाला.

जेमतेम पंधरा मिनिटांची भेट! पण ती भेट मला युगायुगांची वाटली. नेहरू कुटुंबावर चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याचा संकल्प या वेळी मी सोडला होता. यशवंतरावजींना ही गोष्ट माहीत होती. त्यामुळेच त्यांनी माझी ही भेट घडवून आणली होती.

दिलखुलास हसून इंदिराजींनी मला विचारलं, ''काय हवंय तुम्हाला?''

मीही अल्पसं हास्य करून म्हणालो, ''मी नेहरू कुटुंबावर चरित्रात्मक कादंबरी लिहिणार आहे. त्यासाठी मला काही खास माहिती मिळाली तर हवी आहे!''

पुन्हा एकदा हास्य करून इंदिराजी म्हणाल्या, ''आमच्या बाबतीतील सारी माहिती उजेडात आलेली आहे. अंधारात काही राहिलेलं नाही! तेव्हा....''

त्यांचं म्हणणं खरं होतं आणि ते मला माहीत होतं. मला फक्त त्यांच्या कानावर माझ्या कादंबरीची गोष्ट घालायची होती आणि त्यांच्याकडून सदिच्छा मागून घ्यायच्या होत्या.

''आपल्या सदिच्छा मला हव्या आहेत,'' असं मी म्हटलं, तेव्हा इंदिराजी म्हणाल्या, ''आपल्या कामासाठी जरूर माझ्या सदिच्छा आहेत, गो अहेड!''

त्यांचं ते आश्वासक बोलणं ऐकून मला फार बरं वाटलं. अधिक काही बोलायचं नव्हतं. त्यांच्याबरोबर फोटोही निघाला होता. भेट संपली होती. मी भारावून गेलो होतो. इंदिराजी झपाझप आत्मविश्वासात्मक पावलं टाकत समोरच्या हिरवळीकडे केव्हा निघून गेल्या होत्या, तेही मला कळलं नाही. तिथे त्यांच्या सांघिक भेटी होणार होत्या.

त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघून मी मनात म्हणत होतो, या बाईचा आत्मविश्वास खरोखरच जोन ऑफ आर्क किंवा झाशीच्या राणीला शोभण्यासारखा आहे.

इंदिराजींच्या या भेटीचा धागा धरून पुण्याला आल्यावर मी आनंदमयी माताजींना त्यांच्या गणेशखिंड रोडवरील शाही बंगल्यात जाऊन भेटलो. माताजींना इंदिराजी गुरुस्थानी मानत असत, ही गोष्ट मला माहीत होती. त्यामुळे मी माताजींकडे जाऊन माझ्या कादंबरीची गोष्ट त्यांच्या कानावर घातली. त्या दिवशी गुरुवार होता. माताजींचं त्या दिवशी मौन होतं. परंतु माझ्या कादंबरीबद्दल आणि इंदिराजींच्या भेटीबद्दल मी जेव्हा त्यांना सांगितलं तेव्हा त्यांच्या मुद्रेवर एकदम प्रसन्नता पसरली. त्यांनी माझ्या मस्तकावर दोन्ही हात ठेवले आणि नारायणनाम उच्चारून मला आशीर्वाद दिला.

माताजींचे प्रमुख शिष्य मला म्हणाले, ''तुम्ही भाग्यवान आहात. माताजींनी मौनातही तुम्हाला आशीर्वाद दिला. तुमचं काम फत्ते होणार!''

माताजींच्या भेटीची ही हकिगत मी इंदिराजींना पत्रानं कळवली होती.

तसा विचार केला तर माताजींच्या शिष्यानं म्हटल्याप्रमाणे माझं काम फत्ते झालं होतं. नेहरू कुटुंबावरील 'आनंद भवन' या माझ्या कादंबरीला सोव्हिएत लॅण्डचं नेहरू पारितोषिक मिळालं. त्या कादंबरीच्या तीन आवृत्त्या निघाल्या. इंग्रजी आणि हिंदी या भाषांतूनही ती कादंबरी लवकरच प्रसिद्ध होणार आहे. या साऱ्या गोष्टींना फत्ते झाली असं म्हणायचं नाही तर काय म्हणायचं?

'आनंद भवन' ही कादंबरी हिंदी-इंग्रजीतून यापूर्वीच प्रसिद्ध झाली असती तर मला फार बरं वाटलं असतं. कारण इंदिराजींना ती कादंबरी सरळ वाचता आली असती. मी त्यांच्याकडे 'आनंद भवन' या कादंबरीची मराठी प्रत पाठविली होती तेव्हा त्यांनी मला आभाराचं पत्र पाठवलं होतं. त्यात आपल्याला मराठी येत नाही, या गोष्टीची खंत व्यक्त केली होती, असं मला स्मरतं.

इंदिराजींमुळे आणखी एका फार मोठ्या गोष्टीत माझी फत्ते झाली होती. यशवंतरावजींच्या सांगण्यावरून जपानभेटीच्या वेळी इंदिराजींनी माझी शिफारस केली होती. त्यामुळे जपानभेटीची केवढी मोठी संधी मला मिळाली होती! अर्थात् हे सारं यशवंतरावजी चव्हाण यांच्यामुळे घडलं होतं, ही गोष्ट मला कधीच नाकारता येणार नाही. त्यांच्या शब्दाला इंदिराजींच्या लेखी फार मोठी किंमत होती, हेच त्यामुळे सिद्ध होतं. परंतु त्याचबरोबर इंदिराजींच्या मनाचा मोठेपणाही मला विसरता येणार नाही.

इंदिराजींच्या हस्ते दोन वेळा माझा जाहीर सत्कार होण्याचंही दुर्मिळ भाग्य मला लाभलं. १९७६ मध्ये सात हजार पृष्ठांचं समग्र टिळक साहित्य प्रकाशित झालं. त्या साहित्याचा मी एक संपादक होतो. लोकमान्यांच्या साहित्याचा एक संपादक होणं हे तर महाभाग्याचं लक्षण होतंच; त्याचबरोबर इंदिराजींच्या शुभ हस्ते सत्कार होण्याचं भाग्य हेही खचितच मोलाचं होतं. एखाद्या भाग्यापाठोपाठ दुसरं भाग्य लागून येतं, हेही एक भाग्यच मानायला नको का? हे सारं देवाचं आणि दैवाचं कर्तुक असतं; माणसाचं नक्कीच नाही!

१९८१ मध्ये मला आणखी तशाच मोलाचं भाग्य लाभलं. त्या वर्षी 'केसरी'च्या शताब्दीचा दीड हजार पृष्ठांचा ग्रंथ मी प्रसिद्ध केला. त्या

ग्रंथाच्या संपादनाबद्दलही इंदिराजींच्या हस्ते पुन्हा एकदा माझा टिळक स्मारक मंदिरात जाहीर सत्कार झाला.

त्या वेळी एक गंमत झाली. ती जाता जाता सहज सांगायला हवी! माझा सत्कार होणार आहे ही गोष्ट मला प्रत्यक्ष समारंभापर्यंत माहीत नव्हती. मी मुद्दामहून अगदी मागे जाऊन बसलो होतो. ऐन वेळी श्री. पु. गोखले आणि विष्णुपंत मेहेंदळे हे दोघे मला शोधत मागे आले आणि मला दटावून म्हणाले, ''इथे काय बसलात? तुमचा सत्कार आहे इंदिराजींच्या हस्ते! चला पुढे!''

मी पुढे गेलो. पण साऱ्या खुर्च्या भल्या भल्या माणसांनी फुलल्या होत्या. इंदिराजींची यायची वेळ झाली होती. पोलिस आणि निमलष्करी सैनिक आपापल्या जागी सज्ज खडे होते. जागेच्या शोधात मला पुढच्या बाजूला एका आडव्या बाकावर जागा मिळाली; परंतु पोलिस-वरिष्ठाधिकारी सहभोजने लगबगीनं माझ्याजवळ धावत आले आणि त्यांनी मला अदबीनं विचारलं, ''तुम्ही इथे का बसलात?... आणि ही मंडळी कोण?''

मी म्हणालो, ''आमचा सत्कार व्हायचा आहे इंदिराजींच्या हस्ते! म्हणून पुढे येऊन बसलो आहोत.''

सहस्रभोजने खातरजमा करून निघून गेले. त्या वेळचे 'केसरी'चे संपादक चंद्रकांत घोरपडे यांनी मला निरोप पाठवून सांगितलं की, सत्कारासाठी स्टेजवर जाण्यासाठी मी तुम्हाला खूण करीन. मी सावरून बसलो.

इंदिराजी आल्या. बंदोबस्ताचे आवाज झाले. आपल्या मराठी पद्धतीनं स्वागताचं शिंग फुंकलं गेलं. सारं वातावरण थरारून उठलं.

इंदिराजींनी नीलवर्ण साडी परिधान केलेली होती. झपाझप पावलं टाकत त्यांची उत्सवमूर्ती स्टेजवर जाऊन केव्हा स्थानापन्न झाली, ते मला कळलंही नाही; कारण त्या वेळी सारा शाही मंडप उभा ठाकला होता. माझी दृष्टी झाकाळून गेली होती.

कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्या वेळचे मुख्यमंत्री अंतुले, जयंतरावजी टिळक, शरच्चंद्र गोखले, चंद्रकांत घोरपडे, राजाभाऊ कुलकर्णी ही मान्यवर मंडळी शोभिवंत व्यासपीठावर स्थानापन्न झाली होती. रामभाऊ जोशी यांनी कार्यक्रमाचं सूत्रचालन हाती घेतलं होतं.

माझ सारं लक्ष चंद्रकांत घोरपडे यांच्या इशाऱ्याकडे होतं.

पहिली स्वागताची भाषणं झाली. समारंभाचा काही भाग संपल्यानंतर ठरल्याप्रमाणे घोरपड्यांनी मला हातानं इशारा केला. मी तत्परतेनं उठलो आणि व्यासपीठाच्या दिशेनं भराभर पावलं टाकायला लागलो. कारण महामंत्र्यांचे सारे कार्यक्रम सेकंदांच्या चालीवर पार पडतात, हे मला माहीत होतं. मी व्यासपीठावर जाऊन उभादेखील राहिलो.

मग कुणाच्या तरी लक्षात आलं की, ज्या 'केसरी' या शताब्दी ग्रंथाबद्दल माझा सत्कार होणार होता, तो ग्रंथ प्रकाशित झाल्याचं जाहीरच झालं नव्हतं. कुणीतरी जयंतरावांना हे सुचविल्यावर एकदम गडबड उडाली. ती धावपळ चालली असताना मी तिथेच व्यासपीठावर स्थिरचित्रासारखा उभा होतो. मला धड खालीही जाता येईना आणि तिथे ताटकळत उभं राहणंही जमेना. इंदिराजींच्या मुखावर त्या प्रसंगानं हास्य उमटलं. टेलिव्हिजनचा कॅमेरा फिरतच होता.

शेवटी तो भलामोठा ग्रंथ इंदिराजींनी हातात घेतला आणि प्रेक्षकांना तो वर करून दाखवला. ग्रंथाचं प्रकाशन झालं आणि त्या ग्रंथाबद्दलचा सत्कार स्वीकारण्यासाठी मी इंदिराजींसमोर जाऊन उभा राहिलो.

या प्रसंगीही थोडीशी गंमत झाली. परंतु आजतागायत मी त्याबद्दल कुणाला काही बोललो नाही.

मला इंदिराजींच्या हस्ते चांदीचा पेला देण्यात आला. तो पेला एका चौकोनी बॉक्समध्ये ठेवण्यात आला होता. त्यावर भलामोठा नारळ होता. त्या बॉक्सवर तो नारळ ठेवल्यामुळे ते पार्सल देण्याघेण्याला फारसं सुकर नव्हतं. परंतु तरीही इंदिराजींनी ते मला दिलं. मला ते नीट घेता येईना म्हणून त्यांचा हात तसाच पार्सलखाली राहिला. बराच वेळ त्यांचा हात दूर झाला नाही आणि ते सत्कार-चिन्हाचं पार्सल माझ्या हातात नीट आलं नाही. त्यांचा हात त्या पार्सलखाली तसाच अडकून पडला. भोवतालच्या मंडळींना काहीच कळेना. कॅमेरे फिरतच होते. इंदिराजी हसत होत्या. मी खाली वाकून त्यांच्यासमोर उभा होतो. काही वेळानं ते सत्कारचिन्ह माझ्या हाती आलं. काय झालं ते कुणालाच नेमकं कळलं नाही. फक्त त्या प्रसंगी निघालेल्या त्या निर्जीव छायाचित्राला काय झालं ते समजलं. ते छायाचित्र आजही माझ्या संग्रही आहे.

त्यानंतर १९८४ मध्ये मी इंदिराजींकडे माझी त्या वर्षी प्रसिद्ध

झालेली 'हिरोशिमा' ही कादंबरी भेट म्हणून पाठविली. त्या कादंबरीचा त्यांनी आभारपूर्वक स्वीकार केला होता.

– आणि त्यानंतर लगेच 'हिरोशिमा' या माझ्या कादंबरीला नेहरू पारितोषिक मिळालं होतं. त्याबद्दल अभिनंदनाची तार मला आली होती. मला जपानला पाठविण्यात इंदिराजींचा सहभाग होता. त्यांना ही सुवार्ता मी नक्कीच कळवणार होतो; परंतु त्याच दिवशी ती कुवार्ता माझ्या कानी आली होती. कालपुरुषानं त्यांना या जगातून कायमचं नेलं होतं.

त्या नुकत्याच कुठल्यातरी राज्यात जाऊन दिल्लीला परतल्या होत्या. तिथल्या विराट सभेत बोलताना रक्ताचा शेवटचा रक्तबिंदू सांडेपर्यंत आपला देह देशासाठी झिजविण्याची घोषणा त्यांनी केली होती. त्याप्रमाणे देशसेवा करतानाच त्यांचा देह सांडला होता. मायभूमीवर त्यांनी आपल्या पवित्र रक्ताचा सडा शिंपडला होता.

पण त्यांचे देशबांधव? स्वकीयांनीच त्यांच्याविरुद्ध हा दावा का साधला होता?

मी दिङ्मूढ होऊन गेलो होतो. माणसानं माणसाला गोळ्या घालाव्यात हा प्रकारच मला रानटी वाटतो. उपनिषदात सांगितल्याप्रमाणे माणसाची झेप अंधारातून उजेडाकडे जात असते. प्रकाशात आलेला मानवप्राणी उलटा अंधाराकडे कधीच जात नाही. प्रगतावस्थेतून रानटी अवस्थेकडे माणसानं कधी जायचं असतं का? मतभेद हे माणसाच्या पाचवीला पुजलेले असतात; परंतु ते गोडीनं सोडविण्याऐवजी गोळ्यांनी सोडवायचे असतात का? खरं तर प्रियदर्शनीवर गोळ्या सोडणं सैतानालाही साधलं नसतं. स्वतःला माणूस म्हणायला त्या वेळी सैतानालाही लाज वाटली असती.

माझ्या या असल्या विचारांना या आधुनिक तथाकथित सुधारलेल्या जगात काहीच किंमत नाही का?

माझ्या मनानं अशा प्रकारचा कितीही टाहो फोडला तरी इंदिराजी थोड्याच परतणार होत्या? या जगातून गेलेली चांगली माणसं पुन्हा कधी परत येत नाहीत.

माणूस परमेश्वरापुढे लंगडा पडतो तो इथेच!

◆

पुस्तकाच्या पानांतून

प्रवाह

महादेव मोरे

स्त्री-पुरुष संबंधाचं उकळतं रसायन ते प्रेमाचं शीतल संवेदन ...
एका लेखकाच्या जीवनाचा भन्नाट प्रवास

एक

दिनांक २०-३-५७ बुधवार

संध्याकाळचे सहा. शेवटचा पेपर देऊन झाला. परीक्षा संपली. बारा वर्षाच्या तपश्चर्येची समाप्ती. बारा वर्षे, एक तप-बिगरीपासून एस.एस.सी.पर्यंत! वर्षभर मिळविलेलं ज्ञान तीन तासांच्या ठरावीक वेळेत पेपरात कोंबायचं. परीक्षेच्या आधी दोन-एक महिने केलेल्या त्या

अविश्रांत श्रमांची आठवण... आज ते सारं संपलं.

भूतकाळाच्या वहीवरला विस्मृतीचा धुरळा झाडून जरा पाहिलं तर मन चरकतंय आता! या बारा वर्षांत मी काय मिळविलं? पास झालोच तर एस.एस.सी.च्या सर्टिफिकेटचा वीतभर कागद! माझ्यापुढं हे अफाट व्यवहारी जग पसरलंय. आजवर शाळेत मिळविलेल्या ज्ञानाचा या जगात कितीसा उपयोग होणार आहे? यामुळेच आता एस.एस.सी.नंतर पुढे काय, असा माझ्यासारख्याला प्रश्न पडतो आहे.

तसा मी आज सकाळी सहालाच उठलो, रात्री अभ्यास करीत बारापर्यंत जागूनही. परीक्षेचा ब्रह्मराक्षस मानगुटीवर असलेला, मग सांगतोय कुणाला? काल रात्री बारापर्यंत भूगोल केला होता, म्हणून उठल्याबरोबर विज्ञान-रसायन हाती घेतलं. पहिला पेपर विज्ञान-रसायनाचा व दुसरा भूगोलाचा आहेसं वाटलं होतं; पण झालं उलटंच! त्यामुळे भूगोलाचा 'हिंदुस्थान' विषयक अभ्यास पहिला पेपर संपल्यावर मिळणाऱ्या तासाभराच्या सुट्टीत करता येईल, असा विचार करून केला नव्हता, तो तसाच राहिला; पण सुदैवाने पहिला पेपर सोपा काढला होता. तरीही प्रत्येक प्रश्नाला लिहावं लागलं मात्र खूप! त्यामुळं मला तरी तीन तासांचा वेळ अपुरा पडला. शेवटचे दोन प्रश्न– त्यातील एक तर अर्धाच राहिला. कसेतरी ओढून काढले...

दुपारचे तीन ते सहा, विज्ञान-रसायनाचा पेपर! अपेक्षित प्रश्न पडले नाहीत. शिवाय पेपर अवघड काढलेला. त्यामुळे माझा जवळजवळ दोन तासांचा वेळ विज्ञानाचे चार प्रश्न, तरी अपुरे, सोडविण्यात गेला. त्यामुळे रसायनाचे केवळ दोनच प्रश्न सोडविण्यापुरता वेळ मिळाला. बाकीचे दोन प्रश्न तसेच राहिले.

सहा वाजले. शेवटची घंटा झाली. मनात खळबळ माजली... हा शेवटचा पेपर! उद्यापासून आपला व शाळेचा संबंध संपला. जेथे वयाची सात वर्षे आनंदाने-उत्साहाने, मजेने काढली, त्या शाळेचा संबंध संपला. त्यापूर्वीही बिगरीपासून चौथीपर्यंत पाच वर्षे प्राथमिक शाळेतील, अन् चौथीनंतर या हायस्कूलशी नशीब बांधलेलं... पुरी सात वर्षं. मंतरलेल्या दिवसांनी भरलेली सात वर्षं... तर ती वर्षं आता संपली आणि ते मंतरलेले दिवसही!

पेपर सुपरवायझरच्या हातात दिला न् घरी आलो आणि कपडे वगैरे बदलून फिरायला बाहेर पडलो. फिरून येताना मंडईत जाऊन मटण आणण्यासाठी

सोबत पैसेही आईकडून मागून घेतले. एस.टी. स्टॅन्डजवळ आलो. तेथे 'धड्यांव्' भेटला. याचं 'सदू पाटील' असं झकास नाव असूनही 'धड्यांव्' हे अफलातून नाव कुणी ठेवलंय कोणास ठाऊक! कदाचित अभ्यासात पूर्वी तो 'धड्' म्हणजे 'ढ' असावा...

''फिरायला का रेऽ!'' त्यानं विचारलं.

''होय.''

''थांब, मीही आलो!'' तो म्हणाला आणि त्याने आपल्या जवळची वह्या-पुस्तकं सोबतच्या एका मित्राकडे दिली.

मग आम्ही निघालो-गावाबाहेर असलेल्या आमच्या हायस्कूलपर्यंत... एकमेकांचे पेपर्स कसे काय गेले, याची रस्त्यात उजळणी झाली... नंतर नेहमीप्रमाणेच दोन वा अधिक मुलं एकत्र आल्यावर जो विषय निघतो, तो निघाला– मुलींचा!

माझ्या जवळच सीट नंबर असलेल्या योगेनतारा कोठारीबद्दल तो काही बडबडला... माझ्या जागी त्याचा नंबर आला असता तर आपण काय केलं असतं, तेही त्याने सांगितलं. एवढा मोठा चान्स सोडल्याबद्दल त्याने मला दोष दिला... फिरून येईपर्यंत आम्ही हेच सूत वळत होतो...

परत येत असता सोमवारपेठेच्या तिठ्ठ्यावर हातात रंगाच्या बाटल्या व रंगाचा गिल्ला घेऊन रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना 'मेकअप' करणारा पोरांचा घोळका दिसला; तशी आत 'रंगपंचमी' असल्याचा साक्षात्कार झाला!

''आता रे?'' धड्यांव्ने माझ्याकडे पाहिलं, ''येथून गेलं की, पोरं अंगावर रंग मारणार, तेव्हा गावातून जरा लांबचा फेरा मारून जाऊ काय? पण गावातही रंग मारणारच...''

असा स्वत:शीच प्रश्न विचारून तो स्वत:च उत्तर देत होता. त्याचं घर गणेशवाडीत, त्यामुळे त्याला पुढे जावं लागणार होतं. माझं घर जवळच होतं; तेव्हा मी सल्ला दिला,

''गप्प, तू पॉवर हाउसकडून जा! पॉवर हाउस गावाच्या पश्चिमेस, थोडं बाहेर; त्यामुळे तिकडे विशेष वर्दळ नसे...''

''हां, तसंच करतो! पण तूही चल की 'क्लब'कडे!''

हा क्लब म्हणजे 'बालवीर क्लब.' एक छोटीशी संस्था. विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी कार्य करणारी; अभ्यास, देशी-विदेशी खेळ याबाबत, क्लबचे

संचालक नुसती जुजबी देखरेख करीत. वरच्या वर्गातील विद्यार्थीच कॅप्टन, उपकॅप्टन, सेक्रेटरी आदी अधिकाराच्या जागा भूषवीत, अन् त्या जागांना शोभेशा जबाबदारीने कामेही करीत... या क्लबला सरकारी मदतही मिळे. वर्षातून एकदा सरकारी अधिकारी येत, इन्स्पेक्शन होई. 'क्लब'च्या विद्यार्थ्यांसारखी कवायत एन.सी.सी.ची मुलेही करीत नसत...

''आता नाही येत तिकडे मी, गावात थोडं काम आहे माझं!''

''पोरींच्या घरावरनं 'लायनी' मारायच्या असतील, हेच काम की!''

''नाही रे, खरंच काम आहे माझं!'' मी म्हणालो.

तरीही तो अविश्वासून एकटाच निघून गेला; तसा मग मी 'ड्रिमलॅन्ड' टॉकीजमध्ये सिनेमाची पोस्टर्स पाहावयास गेलो; तेथून मग सरळ 'भारत' टॉकीजकडे. अर्थात वाटेत दोन-तीन मुलींची घरं लागली, याला मी तरी काय करणार? मात्र त्या पोरी घरी नव्हत्या हे माझं दुर्दैव! पण हां, वासंती सावंतच्या घरापुढून थोडं अंतर गेलो, एवढ्यात सुलभा कामतची परफेक्ट फोर्ड समोरून आली. आत आमच्या शिक्षिका चारुताबाई कार्वेकर व वासंती दिसल्या. सुलभीही असावी; पण दिसली नाही. आयला ऽ, पेपर संपून इतका वेळ झाला तरी अजूनही 'या' मोटारीतूनच हिंडताहेत! चारुताबाई सुलभीच्याच घरी भाडेकरू म्हणून आहेत... पंचविशी सरून गेली असावी त्यांची. थोड्या स्थूलही दिसू लागल्यात. अजूनही अविवाहित आहेत... यांचं केव्हा लग्न जमायचं? एव्हाना दोन-तीन मुलं व्हायला हवीत; की लग्न जमत नाही म्हणून केवळ ही शिक्षिकेची नोकरी? किंवा लग्न जमेपर्यंतच...?

ड्रिमलॅन्डजवळच योगेनताराचं घर आहे, असं मला धड्यांव्ने सांगितलेलं होतं. तिचा पत्ता शोधण्यात यश आलं; पण ती मात्र घरी नव्हती, हेही दुर्दैवच! आज माझ्या वाट्याला दुर्दैवच जास्त यायला लागलंय, त्येच्या आयला! मग 'भारत' टॉकीजकडे आलो; 'दो दुल्हे' व 'इन्सानियत'ची पोस्टर्स लावली होती... हे चित्रपट आता किती जुने झाले आहेत, तरीही भारतवाल्याने ते आता मागविल्याबद्दल मनातल्या मनात त्याला चार शिव्या हासडल्या, मग मंडईत गेलो आणि मटण घेऊन घरी आलो...

घरी येताना अर्थातच सुलभीच्या घरावरून यावंच लागलं, तर सुलभी आणि कंपनी दारात! चला, तेवढीच 'लाइन' पडली!

घरी आल्यावर रेडिओजवळची पुस्तकं व वह्या व्यवस्थित लावून ठेवल्या.

तोवर आठही वाजले. आज बुधवार, त्यामुळे नेहमीसारखी 'बिनाका गीतमाला' लावली. त्यातील 'करले दिल का सौदा दिलसे, दिल मिलता है मुश्किलसे' हे 'एक झलक' मधील गीता दत्तनं म्हटलेलं व हेमंतकुमारनं संगीत दिलेलं गाणं. तसेच, 'मिस्टर जॉन, ये बाबाखान, ये लाला रोशनलाल...' हे आशा भोसलेनं 'बारीश' मध्ये गायलेलं व सी. रामचंद्रनं संगीत दिलेलं आणि 'च्योटीचं' 'आजा जरा मेरे, दिलके सहारे दिलरुबा' हे हेमंतकुमार व गीता दत्तचं 'एक झलक' मधीलच द्वंद्वगीत, ही गाणी मला तरी फार आवडली. मग मटणाच्या कोरड्याशावर यथेच्छ ताव मारून परीक्षेच्या 'आठ दिवसांची' उणीव भरून काढली. गेल्या आठवड्याभरात पोटभर जेवणंही नाही कधी–जास्त जेवल्यावर सुस्ती येते न् त्यापाठोपाठ खूप झोपही; म्हणून!

जेवण झाल्यावर रोजनिशी लिहिण्याच्या निश्चयाने बसलो... आता घड्याळात पावणे अकरा वाजले आहेत, तेव्हा झोपी गेलेलं बरं...

◆

नवी संहिता... नवा आशय...

भावगिरी

रवींद्र धामापूरकर



कोकणातला गूढरम्य निसर्ग,
तेथील परंपरा आणि श्रद्धा यांचा सौंदर्यपूर्ण कोलाज

किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

॥ गंधर्वगाथा ॥

भा. द. खेर



बालगंधर्वांच्या कलाजीवनातील आणि लौकिक जीवनातील
भावनाट्य टिपणारी कादंबरी

किंमत : ३६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

ज्ञानसूर्याचे आकाश

मंजुश्री गोखले



निवृत्तिनाथांच्या व्यक्तित्वाचा रसाळ भाषेत घेतलेला परिपूर्ण वेध

किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, २०२४ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचावर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत.

१६ जानेवारी-नानी पालखीवाला यांचा जन्मदिन.

'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ५९२/-

---

१६ जानेवारी-मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन.

'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-

---

१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन.

'कांगारू देशीच्या गोष्टी'(४ पुस्तकांचा संच)या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

---

१९ जानेवारी-अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन.

'रेड टेप'या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-

---

२१ जानेवारी-डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन.

'पूजाघर','काया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २९९/-

---

२१ जानेवारी-पॉल ॲलन यांचा जन्मदिन.

'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-

---

२१ जानेवारी-रमेश जोशी यांचा जन्मदिन.

'अंतर्नाद' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत २०८/-

---

२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन

'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

२३ जानेवारी-नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती.

'नेताजी','नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ६३५/- । सवलत किंमत ४७६/-

२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिवस

'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६०९/-

२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-

२३ जानेवारी - चार्ल्स ग्लास यांचा जन्मदिन

'ते एकाकी लढले' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन

'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

२५ जानेवारी - अश्विन सांघी यांचा जन्मदिन

'दि व्हॉल्ट ऑफ विष्णू', 'दि रोझाबल लाइन', 'द कृष्णा की', 'सियालकोट गाथा', 'माझदाचे जादूगार', 'कालचक्राचे रक्षक', 'चाणक्याचा मंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३९८९/- । सवलत किंमत ३१५१/-

२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन

'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला

भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४६६०/- । सवलत किंमत ३०३०/-

२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस

'लेडिज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-

२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन

'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २८०/-

२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन

'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

२८जानेवारी-डॉ.अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस

'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझेन्टेशन स्किल्स','जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी-डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन

'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

३०जानेवारी-पिंकी विराणी यांचा जन्मदिवस

'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ९५५/- । सवलत किंमत ६६९/-

खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत

१ फेब्रुवारी-सोफी लगूना यांचा जन्मदिन.

'वन फुट राँग' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-

२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस

'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच ॲन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-

३ फेब्रुवारी-दीप्ती नवल यांचा जन्मदिन

'द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!'या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस

'गर्भसंस्कार','स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २३५/-

४ फेब्रुवारी-फेसबुक डे

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस.

'आकाशवेध','जन्मठेप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत १८९/-

८ फेब्रुवारी-जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस.

'अ टाइम टु किल,''द असोशिएट','द चेम्बर','द क्लायंट','द फर्म','द पेलिकन ब्रीफ','द रेनमेकर','द पाटर्नर','द रनअवे ज्यूरी','द लास्ट ज्यूरर','द टेस्टामेंट', 'द स्ट्रीट लॉयर','द ब्रोकर','द इनोसंट मॅन','द रॅकेटिअर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६७५०/- । सवलत किंमत ५०८६/-

८ फेब्रुवारी-अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन

'पटना ब्लूज' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-

१० फेब्रुवारी-अजित जाधव यांचा जन्मदिन

'वास्तु-अजित' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३७९/-

१० फेब्रुवारी-राधिका टिपरे यांचा जन्मदिन

'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-

११ फेब्रुवारी-स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस.

'फिश!','फिश! फॉर लाइफ','फिश! स्टीक्स','फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९०/-

११ फेब्रुवारी-सिडनी शेल्डन यांचा जन्मदिन

'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-

१२ फेब्रुवारी-दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०७/-

१२ फेब्रुवारी-वैदेही यांचा जन्मदिन

'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-

१२ फेब्रुवारी-राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन

'कहाणी पहिल्या आगीनगाडीची' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

१३ फेब्रुवारी-कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-

१४ फेब्रुवारी-व्हॅलेंटाइन डे

संच १-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी','प्रेमाची परिभाषा','अनादि-अनंत','अद्वैत','आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद','चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग–१ आणि भाग-२' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३६२०/- । सवलत किंमत २४४९/-

संच २ -'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-

◆

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा

या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com

नवी संहिता... नवा आशय...

मॅन vs ओशन



ॲडम वॉकर

अनुवाद

मोहन गोखले

सात समुद्रसाहसं करतो एक टोस्टरविक्रेता...
त्या साहसांची थरारक, प्रेरणादायक गाथा

किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.

उपचार तन मनाचे

जो मर्चंट

अनुवाद

श्रीनिवास वैद्य

मन आणि शरीर यांच्यावर एकत्रितपणे केल्या जाणाऱ्या
उपचारांबद्दलची सर्वांगीण माहिती

किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

रसाळपूर्ण आणि
मनोरंजक शैलीतील,
मुलांना गुंतवून ठेवणाऱ्या
रंगतदार कथा

सुधा मूर्तींच्या बालकथा



लेखक
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

ebook available

प्राण्यांच्या भावविश्वाची सचित्र सफर

चकाचक चंपू
आणि
इतर कथा

पुस्तक वाचणारं
फुलपाखरू

उडणारी मगरूळी

राजीव
तांबे

RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/01/2024 Posting Date : 11/01/2024

आवर्जून वाचावे...







मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____